INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY
8/4/06

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक


३ ● परिशीलन

५ ● पाश्चात्यांच्या दृष्टिकोणातून 'सेक्युलॅरिझम'

१२ ● 'ब्रेनड्रेन'वर उपाय काय ?

१८ ● कामगार सुधारणांची पंचसूत्री

२४ ● राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना परिणामकारक ठरण्यासाठी.....

३४ ● ई - नाक

३६ ● 'हार्ड पॉवर' आणि 'सॉफ्ट पॉवर'

३७ ● जिकडे-तिकडे

● छोट्याशा देशाचे मोठे उदाहरण

● न वाचणाऱ्यांचा देश

४० ● 'काल'चे 'आज'साठी (....गावाची पवित्र घडवाची मूर्ती)


खंड ५ : अंक १ एप्रिल २००६

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**वर्गणीसाठी पत्ता :**

व्यवस्थापक,

**अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२

: २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ५ (अंक १) एप्रिल २००६**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेखन देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्दिष्ट. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली

**'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'**

अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# परिशीलन

आगगाडीतून प्रवास करताना खिडकीतून बाहेर बघत बसणे हा एक अतिशय आल्हाददायक अनुभव असतो. दृश्यांची एक चेतोहर मालिका आपल्या नजरेसमोर साकारत राहते आणि बघताबघता झर्रदिशी नजरेच्या टप्प्यापलीकडे निघूनही जाते. मुक्कामाचे ठिकाण गाठल्यानंतर मनामध्ये रेंगाळत राहतात त्या केवळ त्यातील काही देखाव्यांच्या अमिट स्मृती. याच कारणासाठी घरी पोहोचल्यावर कित्येकजण विरंगुळा म्हणून पुन्हा रेल्वेचे वेळापत्रक चाळत बसतात. नवीन ठिकाणे न्याहाळण्यासाठी नव्याने प्रस्थान ठेवण्याचे संकल्प या अशा कागदोपत्रीच्या मुशाफिरीतूनच तर साकारत असतात. आपल्या सगळ्यांच्या रोजच्या जगण्यातदेखील असेच काहीसे घडत असते. वृत्तपत्रादी प्रसिद्धीमाध्यमांद्वारे, घरातील दूरचित्रवाणी संचाच्या छोट्या पडद्यावरून हररोज अक्षरशः हजारो विषय आपल्या अनुभवकक्षेत प्रवेशत असतात. त्यापैकी कित्येक विषय आपले कुतूहल चाळवितात. काही विषय तर त्या त्या वेळी आपला कब्जा घेतात. अशा विषयांबाबत अधिक काहीतरी वाचावे, असेही आपल्याला प्रकर्षाने वाटते. परंतु, तसे करणे आपल्याला हमखास जमतेच असे नाही. मग हळूहळू ती धग मावळते. आपणही रोजच्या रामरगाड्यात जुंपले जातो. मनात रेंगाळलेल्या विषयांचे परिशीलन करणे राहून गेले तरी, ते विषय आपल्या स्मरणमंजुषेतून पूणर्तः हद्दपारच झालेले असतात, असेही म्हणवत नाही. तळ्याच्या तळातून अवचितच वर उसळी घेणाऱ्या एखाद्या मासोळीप्रमाणे एखाददिवशी कारणपरत्त्वे त्यापैकी कोणता तरी विषय मनाच्या पृष्ठभागावर येतो. अवचितच एखादा विषय कारण-अकारण वादग्रस्त बनतो. मग त्यावर चर्चा-वादविवादांचे मोहोळ उठते. एखादी घटना, वृत्तपत्रातील एखादी बातमीही या प्रक्रियेस कारणभूत ठरते. मग आपणच पुन्हा त्या विषयाचा विचार करावयास लागतो. आपल्याला स्मृतिकातर बनविण्याबरोबरच शोधयात्रेस प्रवृत्त करण्याचे सामर्थ्यही या अशा, तोवर दृष्टिपटलाआड गेलेल्या, विषयांच्या ठायी असते. 'सेक्युलॅरिझम' हा असाच एक विषय. गरमागरम वादविवादांना कायम खाद्य पुरविणारा. मात्र, हा विषय आपल्याइतकाच पाश्चात्य देशांमध्येही

वादग्रस्त ठरला आहे वा ठरतो आहे, हे आपल्याला फारसे माहिती नसते. 'अर्थबोधपत्रिके' च्या या अंकातील यासंबंधीचा लेख म्हणूनच वाचनीय ठरावा. एप्रिल महिन्यापासून 'पत्रिके'चे नवीन वर्ष सुरू होते आहे. या अंकापासून एक नवे सदर सादर करीत आहोत. आपल्या वाचनात, संभाषणात नाना प्रकारच्या संज्ञा अलीकडे वारंवार येत असतात. मात्र त्यांच्या अर्थाचा परीघ नेमका किती विस्तारलेला आहे, याची आपल्याला कल्पना नसते. अशा काही संज्ञा-संकल्पनांचा परिचय या सदरामधून घडविण्याचा मानस आहे. वाचकांना हा उपक्रम उपयुक्त वाटेल अशी आशा आहे. या सदरामधून कोणकोणत्या संकल्पनांचा परिचय घडावा याबाबतच्या अपेक्षाही वाचकांनी कळविल्या तरी आनंदच होईल.✿✿

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

सांस्कृतिक

# पाश्चात्यांच्या दृष्टिकोणातून 'सेक्युलॅरिझम'

गेल्या पाच वर्षांतील काही घडामोडींनी पाश्चात्य देशांमधील शांतता भंग पावली आहे. इस्लामसमर्थक दहशतवाद्यांनी ११ सप्टेंबर २००१ रोजी केलेला हल्ला, अमेरिका-इराक युद्ध, फ्रान्समध्ये मुस्लिम तरुणींनी/स्त्रियांनी सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः शाळांमध्ये 'हिजाब' घालण्यावरून उठलेले वादळ, त्यानंतर सार्वजनिक ठिकाणी सर्वच धर्मांतील धार्मिक चिन्हे न वापरण्याबाबत फ्रान्सने केलेला कायदा, डच नागरिक असलेले चित्रपट निर्माते थिओ वॅन गोग यांची झालेली हत्या, लंडनमधील भुयारी रेल्वेत झालेले बॉंबस्फोट आणि डेन्मार्कमध्ये मोहम्मद पैगंबर यांच्यासंबंधी काढण्यात आलेल्या व्यंगचित्रावरून झालेली निदर्शने/हिंसाचार इत्यादी घटनांमुळे तेथे 'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेविषयी नव्याने चर्चा चालू झाली आहे. यापूर्वी, एकोणिसाव्या शतकात धर्म व विज्ञान यांच्या परस्परसंबंधांविषयीची चर्चा झाली; त्या काळात ब्रिटनमध्ये ही संज्ञा उदयास आली व तिचा प्रचार, प्रसार झाला. जॉर्ज जॅकोब होलिओक हे 'सेक्युलॅरिझम' या संज्ञेचे जनक (पृष्ठ ७ पाहावे). वरील घटनांच्या पार्श्वभूमीवर, पाश्चात्य भूमीवरच उदयास आलेला 'सेक्युलॅरिझम' टिकणार का, असा प्रश्न तेथे विचारला जाऊ लागला आहे. 'सेक्युलॅरिझम' म्हणजे काय आणि तो टिकणार का, या विषयावरील पश्चिमेकडील विचारवंतांची मते अमेरिकेतील 'फ्री

---

● *'सेक्युलॅरिझम' या शब्दासाठी 'ऐहिक', 'निधर्मी', 'धर्मनिरपेक्ष' किंवा 'धर्मातीत' असे पर्यायी शब्द भारतात साधारणपणे वापरले जातात. 'सेक्युलॅरिझम' म्हणजे 'सर्वधर्मसमभाव' असाही अर्थ घेतला जातो. मात्र, मूळ इंग्रजी शब्दाचा अर्थ त्यांतून नेमकेपणाने स्पष्ट होत नाही, असाही एक मतप्रवाह आहे. मे. पुं. रेगे यांनी यासाठी 'इहवाद' असा शब्द वापरला आहे. रेगे यांच्या मते भारतीय विचारप्रणालीत याचे साधर्म्य शोधायचे झाले तर चार्वाकाचे तत्त्वज्ञान इहवादी ठरेल. या लेखात मात्र 'सेक्युलॅरिझम' चा वरीलपैकी कोणताही अर्थ वा प्रतिशब्द न घेता 'सेक्युलॅरिझम' हा मूळ इंग्रजी शब्दच वापरला आहे.*

इन्क्वाइअरि' या नियतकालिकाने अलीकडेच प्रसिद्ध केली आहेत. भारत हा 'सेक्युलर' देश असूनही हा विषय येथे नेहमीच वादाच्या भोवऱ्यात फिरत असतो. भारतातील 'सेक्युलॅरिझम'बाबत येथील विचारवंतांची वेगवेगळी मते आहेतच. शिवाय बांगलादेशी लेखिका तसलिमा नासरिन यांनीही "भारताला धर्मनिरपेक्ष देश म्हणताना मी कचरते, इथे मुस्लिम व्यक्तिगत कायद्याखाली मुस्लिम महिलांवर अन्याय होतो. सर्वधर्मीयांना सारखा न्याय देणारा समान नागरी कायदा भारतात अस्तित्वात यावा," असे मत अलीकडेच (सकाळ, ११ मार्च २००६, पुणे) व्यक्त केले आहे. या पार्श्वभूमीवर 'सेक्युलॅरिझम'संबंधीची परदेशांमधील मतमतांतरे जाणून घेणे उद्बोधक ठरेल.

**वॅन हार्वे : धर्म-अभ्यास या विषयाचे सुप्रतिष्ठ प्राध्यापक-अभ्यासक स्टॅनफर्ड विद्यापीठ.** 'अ हँडबुक ऑफ थिऑलॉजिकल टर्म्स' या पुस्तकाचे लेखक असणाऱ्या हार्वे यांच्या मते 'सेक्युलॅरिझम' हा शब्द दोन बाबींसंदर्भात वापरला जाऊ शकतो. एक म्हणजे, समाजातील विविध संस्थांवरील धार्मिक नियंत्रणाचा अभाव ('इन्स्टिट्यूशनल सेक्युलॅरिझम') आणि दुसरे म्हणजे संस्कृतींच्या प्रांतात धार्मिक चिन्हांचा अभाव ('कल्चरल सेक्युलॅरिझम'). ते स्पष्ट करतात की, संस्थांवर धार्मिक नियंत्रण नसणे म्हणजे धर्मांशी शत्रुत्व असे नाही. तसेच संस्कृतींच्या प्रांतात धार्मिक चिन्हांचा अभाव म्हणजे धर्मांप्रती अलिप्तता होय, धर्मांशी वैर नव्हे. अमेरिकेत जसजशी बहुधर्मीयता वाढते आहे त्यावरून असे दिसते की 'इन्स्टिट्यूशनल सेक्युलॅरिझम'बाबत वाद झाले तरी तो टिकून राहील. कारण त्यात चर्च व राज्य/प्रशासन यांच्या कामकाजाबाबत भेद करण्यात आला आहे, तसेच त्याद्वारे 'सेक्युलॅरिस्ट' व 'धार्मिक अल्पसंख्याक' या दोहोंचे रक्षण होते. मात्र 'कल्चरल सेक्युलॅरिझम' सतत वादाच्या भोवऱ्यात राहील, धार्मिक गटांकडून त्यावर नेहमीच हल्ले होत राहतील. असे असले तरी दोन्ही प्रकारच्या 'सेक्युलॅरिझम'मध्ये धर्माचा अभावच असल्याने धार्मिक गटांना 'सेक्युलॅरिझम' ही अ-धार्मिक बाब वाटण्याचीच शक्यता आहे. मानवी समाज अधिक मानवतावादी व्हावा यासाठी 'इन्स्टिट्यूशनल सेक्युलॅरिझम' ही पूर्वअट ठरते, हे आता नागरिकांच्या मनांवर ठसण्याची गरज आहे. असे करणे हेही काहींसाठी धार्मिक ठरू शकते तर काहींसाठी नाही.

**विलफ्रेड मॅकक्ले : अध्यक्ष, एक्सलन्स इन ह्यूमॅनिटिज, टेनेसी विद्यापीठ.** 'रिलिजन रिटर्न्स टू द पब्लिक स्क्वेअर : फेथ अँड पॉलिसी इन् अमेरिका' या ग्रंथाचे संपादक असलेल्या मॅकक्ले यांच्या मते 'सेक्युलॅरिझम' टिकेल का, या प्रश्नाचे उत्तर

## जॉर्ज जॅकोब होलिओक आणि त्यांचा 'सेक्युलॅरिझम'

●'सेक्युलॅरिझम' ही मुळातील पाश्चात्य (ब्रिटिश) संकल्पना आहे. या संकल्पनेचे जनक असलेले जॉर्ज जॅकोब होलिओक (जन्म -१८१७ बर्मिंगहॅम, मृत्यू -१९०६ ब्राइटॉन) यांचे बालपण घरच्या धार्मिक वातावरणात गेले. पण युवावस्थेत पदार्पण करताना समाजातील चर्चसंबंधीची चर्चा त्यांच्या कानावर पडत होती; त्या काळापासून त्यांची सामाजिक व राजकीय मते तयार होत गेली. या त्यांच्या विचारांना बळकटी मिळाली ती ब्रिटनमध्ये 'रिफॉर्म बील' मंजूर झाल्यामुळे (१८३२). 'ईश्वर' या संकल्पनेपासून त्यांनी काडीमोड घेतला तो १८४१ साली. पण ते दुराग्रही/हटवादी नास्तिक या गटात मोडणारेही नव्हते, ते अज्ञेयवादी (ईश्वराच्या अस्तित्वाचे ज्ञान मला नाही व मला ते होणारही नाही, असे मानणे) होते. ख्रिस्ती धर्माचे समर्थक आणि विरोधक या दोन्ही गटांतील व्यक्तींशी त्यांचे स्नेहपूर्ण संबंध होते. ●'सेक्युलॅरिझम'चे मूळ तत्त्व, मानवाचा विकास होण्यासाठी दृष्य व भौतिक साधनांचाच वापर केला जाणे/होणे (इहवाद) हे होय. यात आधिभौतिकाचा संबंध येत नाही. ●'सेक्युलॅरिझम'व 'धर्म' यांच्यातील परस्परसंबंध दिवस व रात्र यांच्याप्रमाणे (mutually exclusive) आहेत. म्हणजे दिवस असतो तेव्हा रात्र नसते व रात्र असते तेव्हा दिवस नसतो; याप्रमाणे 'सेक्युलॅरिझम' असतो तेथे धर्म वा त्यासंबंधित बाबी असणार नाहीत व जेथे धर्म व त्यासंबंधित बाबी आहेत तेथे 'सेक्युलॅरिझम' संभवत नाही. ●त्या काळी धर्मश्रद्धांच्या प्रभावामुळे समाजात ज्या काही गंभीर चुका/पद्धती रूढ झाल्या होत्या /होत होत्या, त्यांच्या विरोधात म्हणून ज्या काही प्रतिक्रिया उमटल्या त्यांचाच एक भाग म्हणजे 'सेक्युलॅरिझम' होय. त्यामुळे 'सेक्युलॅरिझम' ही प्राधान्याने 'निषेध चळवळ' (प्रोटेस्ट मुव्हमेंट) होती. अशा अनेक निषेधांचे प्रतिबिंब त्यात पडलेच, पण त्याच वेळी त्यात काही अटळ अशा दोषांचाही प्रवेश झाला. मुळात 'सेक्युलॅरिझम'चे उद्दिष्ट सकारात्मक होते; पण त्या दृष्टिकोणाला काही अंगभूत मर्यादाही आहेत. उदाहरणार्थ, धर्म व जीवनव्यवहार यांच्यातील संबंधांबाबत त्यात स्पष्टता नाही. आताचे ऐहिक जीवन चांगले असण्यासाठी धर्माधारित प्रयत्न करण्यात येऊ शकतात/येतात, याबाबत त्यात स्पष्टता नाही. 'धर्म नको', पण नेमके 'काय हवे' ही स्पष्टता 'सेक्युलॅरिझम'ने केलेली नाही. त्याची सैद्धांतिक भूमिका पक्की उभी राहिलीच नाही. मुळात या शब्दाच्या उगमापासून पश्चिमेतही त्याला अनेक अर्थच्छटा लाभलेल्या आहेत. उदाहरणार्थ, 'सेक्युलॅरिझम' म्हणजे 'एथिइझम' (नास्तिकता) असे समजले जात होते. पण होलिओक यांनी या दोन बाबी वेगळ्या आहेत, असे स्पष्ट केले होते. *(संदर्भ - एन्सायक्लोपिडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स, खंड ११ - पृष्ठे ३४७ ते ३५०)*

आपण 'सेक्युलॅरिझम'चा अर्थ काय घेतो, यावर अवलंबून आहे. राजकीय व सामाजिक व्यवहारांद्वारे एखादा विशिष्ट धार्मिक दृष्टिकोण प्रस्थापित होत नसेल आणि आस्तिक व नास्तिक या दोघांचेही अभिव्यक्तीस्वातंत्र्य जपले जात असेल तर 'सेक्युलॅरिझम' टिकेल. 'सेक्युलॅरिझम'चा हा प्रकार मवाळ/सौम्य आणि नकारात्मक आहे. पण, 'सेक्युलॅरिझम'चा दुसरा प्रकार जहाल/तीव्र/कठोर आणि सकारात्मक आहे. यात सार्वजनिक जीवनात धार्मिक अभिव्यक्ती निषिद्ध मानली जाते. किंबहुना धार्मिक वर्तन म्हणजे काय, याचे स्पष्टीकरणही कायद्याच्या चौकटीत मांडले जाते. असा 'सेक्युलॅरिझम' टिकणे कठीण आहे; कारण, त्याद्वारे 'सेक्युलॅरिझम' हेच एकमेव सत्य आहे असे सूचित केले जाते. असे होणे हे धोकादायकही आहे; कारण, इतिहासाची पाने चाळताना असे दिसून येते की 'सेक्युलॅरिझम' व 'धर्म' या दोहोंना परस्परांची गरज आहे. 'सेक्युलर' विचारांचा प्रवाह प्रबळ असल्यामुळेच समाज धार्मिक अंधश्रद्धांच्या आहारी गेला नाही, ही बाब धार्मिकता जपणाऱ्या नागरिकांनी लक्षात घेतली पाहिजे. मात्र, त्याच वेळी जहाल 'सेक्युलॅरिस्टां'नीही हे लक्षात घ्यावे की काही बाबतीत त्यांचाही आंधळा हटवाद नडतो. न्याय तसेच मानवी प्रतिष्ठेच्या ज्या संकल्पना ते उराशी जपतात त्यांनाही धार्मिक श्रद्धा, परंपरा यांचाच आधार लाभलेला असतो, ही बाब ते नाकारतात

**डॉ. डेव्हिड बर्मन : तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक ट्रिनिटी कॉलेज, डब्लिन.** 'अ हिस्टरि ऑफ एथिइझम इन ब्रिटन', 'आयडियालिझम अँड द मॅन' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. सायकॉलॉजिकल फिलॉसॉफी हा त्यांचा विशेष अभ्यासाचा विषय. त्यांना असे वाटते की, जॉर्ज जॅकोब होलिओक यांना 'सेक्युलॅरिझम'चा जो अर्थ अभिप्रेत आहे त्यानुसार 'सेक्युलॅरिझम'च्या बाबत शंका उपस्थित करणे अप्रस्तुत आहे. आपले दैनंदिन जीवन हे 'सेक्युलॅरिझम'नुसारच चालू आहे व असते. पण व्यवहारात केवळ 'सेक्युलॅरिझम' हा पुरेसा नाही. उदाहरणार्थ, सॉक्रेटिस हा बुद्धिप्रामाण्यवादाचा जनक मानला जातो. पण मानवी शक्तीच्या पलीकडे असणाऱ्या नैसर्गिक शक्तीवर त्याचा विश्वास होता हे अनेकांना माहिती नाही.

**सॅनल इदामारुकू : 'रॅशनॅलिस्ट इंटरनॅशनल' आणि 'इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशन'चे अध्यक्ष.** 'रॅशनॅलिस्ट इंटरनॅशनल' या प्रकाशनाचे ते संपादक आहेत. हे प्रकाशन इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश आणि फिनिश या भाषांमधून प्रसिद्ध केले जाते. 'सेक्युलॅरिझम' हा आधुनिक समाजाचा -संस्कृतीचा पाया असून त्याच्या

विरोधातील प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत असे ठाम मत ते मांडतात. 'सेक्युलॅरिझम'मुळे आपल्या मनाप्रमाणे मानाचे आयुष्य जगण्याची, आपल्या क्षमता वाढविण्याची आणि आकांक्षा पूर्ण करण्याची संधी सर्वांना उपलब्ध होते. एखादे राष्ट्र 'सेक्युलर' असते म्हणजे नागरिकांच्या सार्वजनिक जीवनात, विशेषतः कायदेशीर, कार्यालयीन आणि राजकीय बाबींसंदर्भात विज्ञान व तर्काला महत्त्व देण्याची हमी शासन देते; तसेच धार्मिक वा अतार्किक श्रद्धा जोपासणे ही 'सेक्युलर' राष्ट्रात व्यक्तिगत बाब मानली जाते.

सध्याच्या काळात धार्मिक मूलतत्त्ववाद बोकाळल्याने 'सेक्युलॅरिझम' अडचणीत आला आहे. त्यामुळे 'सेक्युलॅरिझम'च्या समर्थकांना अधिक सजग व कृतीशील राहण्याची गरज आहे. या संदर्भात फ्रान्सने जगासमोर आदर्श घालून दिला आहे. या देशाच्या सरकारने सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः शाळांमध्ये, नागरिकांनी आपापल्या धर्माचे प्रदर्शन करणारी चिन्हे वापरू नयेत, असा कायदा केला आहे. या उलट काही 'सेक्युलर' राष्ट्रे मात्र धार्मिक गटांना पोसत आहेत. चर्च, धार्मिक न्यायालये आणि धर्माच्या आधारे - सांस्कृतिक/सार्वजनिक कार्यक्रमांद्वारे - राष्ट्रवाद पुढे आणत आहेत. तर काही राष्ट्रांनी 'सेक्युलॅरिझम'साठी तडजोड स्वीकारली आहे. अशी राष्ट्रे नागरिकांच्या सार्वजनिक जीवनातून विविध धर्मांना दूर ठेवण्याऐवजी त्यांना सहभागी करून घेतात. त्यामुळे 'सेक्युलॅरिझम'चे उद्दिष्ट साधले जात नाही. 'सेक्युलॅरिझम' टिकविण्यासाठी कोणतीही तडजोड करायला नको. मात्र, या बाबत आव्हानेही आहेत.

**जॉयस सॅलिसबरी : सुप्रतिष्ठ प्राध्यापक, हिस्टरि अँड ह्यूमॅनिटिज, विस्कॉन्सिन विद्यापीठ.** यांची, मध्ययुगीन व धार्मिक इतिहासविषयक अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'सेक्युलॅरिझम' टिकेल असे त्यांना वाटते. फक्त प्रश्न एवढाच आहे की तो राजकीय, तार्किक प्रक्रियेद्वारे टिकेल, की धार्मिक गटांच्या संघर्षानंतर टिकेल ? नागरिकांच्या दैनंदिन जीवनात व सार्वजनिक व्यवहारात, त्यांना स्वातंत्र्य आणि सुखसमाधान लाभावे यासाठी आणि तेवढ्यापुरते आपले नियंत्रण ठेवणारी अशी शासनव्यवस्था, असा 'सेक्युलॅरिझम' चा अर्थ त्यांना अभिप्रेत आहे.. 'सेक्युलर' शासन हे धार्मिक बाबींच्या संदर्भात कायदे करीत नाही वा त्यांच्या श्रद्धांना उत्तेजन देत नाही. मात्र 'सेक्युलर' शासन म्हणजे देवाचे अस्तित्व नाकारणारे शासन असे नव्हे. 'सेक्युलॅरिझम' म्हणजे नास्तिकता नव्हे. खरे तर 'सेक्युलर' शासन हेच धार्मिकांच्या श्रद्धांचे संरक्षण करू शकते.

**रेव्हरंड डेव्हिड नोबेल :** 'माइंड सीज : द बॅटल ऑफ ट्रुथ इन द न्यू मिलेनियम' या पुस्तकाचे एक लेखक. 'सेक्युलॅरिझम' टिकणार नाही, टिकलेला नाही. मात्र कमी प्रमाणात का होईना पण 'सेक्युलर ह्यूमॅनिझम' टिकेल, असे परखड मत ते मांडतात. 'सेक्युलॅरिझम' ही भौतिक विश्वातील एक गुंतागुंत आहे, तो कुठलाही विश्वविषयक दृष्टिकोण नाही, म्हणून तो टिकणार नाही. याउलट, 'सेक्युलर ह्यूमॅनिझम' हा एक धार्मिक दृष्टिकोण आहे. इरविंग क्रिसॉल म्हणतात त्याप्रमाणे 'सेक्युलर ह्यूमॅनिझम' ही बाब विज्ञानाच्या कक्षेपलीकडील आहे; कारण, मानवाच्या ऐहिक जीवनातील सद्यःस्थितीबाबत व भविष्यातील शक्यतांबाबत जे काही निष्कर्ष काढले जातात ते पारलौकिकतेकडे/धार्मिकतेकडे झुकतात. 'सेक्युलर ह्यूमॅनिझम' या दृष्टिकोणाच्या प्रभावाच्या कक्षेत तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, इतिहास, जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, राजकारण असे अनेक विषय येतात, असे डेव्हिड नोबेल स्पष्ट करतात. या सर्व विषयांबाबत, त्यातील मुद्यांबाबत, संकल्पनांबाबत 'सेक्युलॅरिझम' काहीच म्हणत नाही. मग तो टिकावा असे वाटेल तरी कोणाला ? उलट, 'सेक्युलर ह्यूमॅनिझम'ला प्रत्येक विषयात काही मते मांडता येत असल्याने व ती मते मांडण्यास प्रसिद्धीमाध्यमांचे व्यासपीठ उपलब्ध असल्याने तो टिकून राहण्याची शक्यता आहे. तथापि, विसाव्या शतकात अनेक विध्वंसक घटना घडून त्यात लाखो-करोडो नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले असल्याने 'सेक्युलर ह्यूमॅनिझम'चा नैतिक पाया हरविला आहे, असे म्हटले जाते. त्याशिवाय अमेरिकेत तर वेगळेच घडते आहे; 'सेक्युलर ह्यूमॅनिझम'कडे कल असणारे अनेक जण डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या विरोधात असलेल्या व तार्किकतेच्या कसोटीवर न टिकणाऱ्या 'इंटेलिजन्ट डिझाइन'च्या समर्थकांमध्येही सहभागी होत आहेत. हे सर्व पाहता, 'सेक्युलॅरिझम' मृत झाला आहे आणि 'सेक्युलर ह्यूमॅनिझम'ची वाटचालही त्याच दिशेने चालू आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

**मॅरियो बंज : मानद प्राध्यापक, इंटरनॅशनल ॲकॅडमी ऑफ ह्यूमॅनिझम व मॅकगील विद्यापीठ, मॉन्ट्रियल.** पदार्थविज्ञान आणि तत्त्वज्ञान या विषयांवर यांचे ५० ग्रंथ व ५०० संशोधनपर निबंध प्रसिद्ध झाले आहेत. यांना असे वाटते की, आधुनिक समाजव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेल्या 'सेक्युलॅरिझम'ची जगातच, विशेषतः, अमेरिकेत व इस्लामिक देशांमध्ये पीछेहाट होताना दिसते, ही आश्चर्याची बाब आहे. कारण, पाश्चिमात्य देशांमध्ये धर्मसत्तेचे/चर्चचे वर्चस्व होते तेव्हा भारत व

काही इस्लामिक देशांमध्ये धार्मिक सहिष्णुता होती. तसेच अमेरिका हा जगाच्या इतिहासातील पहिला 'सेक्युलर' देश होता. इतर देशांच्या तुलनेत अमेरिकेतच 'सेक्युलॅरिझम'ची पीछेहाट होत राहील.

**डॅनियल पाइप्स : मध्यपूर्वेतील वैचारिक मंचाचे - मिडल ईस्ट फोरमचे - संस्थापक.** नागरिकांच्या सार्वजनिक जीवनात विविध धर्मांना स्थान नाही; धर्म ही त्यांची व्यक्तिगत बाब असून ती व्यक्तिगत जीवनापुरतीच मर्यादित राहील, असे सांगून ते म्हणतात की ही संकल्पना नास्तिकतावादी मंडळींनी पुढे आणली असे नव्हे. तर दोन-तीन शतकांपूर्वी धर्मविषयक चर्चा व युद्धे यांचा अतिरेक झाल्यानंतरही एकमत होऊ शकले नाही म्हणून 'सेक्युलॅरिझम'चा हा मुद्दा पुढे आला. म्हणजे आपले एकमत होऊ शकत नाही हे सर्वांनी मान्य केले (agree to disagree). दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर श्रद्धांचा अतिरेक झाल्याने 'सेक्युलॅरिझम'चा उदय झाला, श्रद्धा नसण्यातून नव्हे. मात्र, आजच्या काळात 'सेक्युलॅरिझम'ला दोन महत्त्वाच्या भूमिका पार पाडायच्या आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर 'जिहाद'चे आव्हान उभे ठाकले असताना धार्मिक युद्धे रोखण्याचा प्रयत्न करणे आणि जागतिकीकरणामुळे विविध देशांमधील नागरिकांचे होत असणारे स्थलांतर पाहता त्यांच्यात एकसंघतेची/ एकात्मिकतेची भावना निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणे.

**व्हिक्टर स्टेंजर : सुप्रतिष्ठ प्राध्यापक, पदार्थविज्ञान व खगोलशास्त्र, हवाई. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, कोलोरॅडो.** 'सेक्युलॅरिझम' टिकेल; कारण, या विज्ञानयुगात देवाची गरज उरलेली नाही. मानवी समाजाच्या बाल्यावस्थेत देव या संकल्पनेचा उदय व प्रचार-प्रसार झाला. आता मानवी समाज पौगंडावस्थेत आहे. या वयात प्रगल्भता आलेली नसते. एका अर्थाने हे वय धोकादायकही असते. कारण आपल्या कृतींवर, विचारांवर पूर्ण नियंत्रण आलेले नसते. हा मानवी समाज पौगंडावस्थेतून सुयोग्य पद्धतीने बाहेर पडला की प्रगल्भ होईल आणि आपल्या दैनंदिन व्यवहारातून देवाला बाजूला करेल.

'सेक्युलॅरिझम' ही पाश्चात्य संकल्पना असल्याने त्या देशांच्या व्यवहारात तिचे स्थान वेगळे आहे. चर्च व शासन यांच्यातील संबंधांबाबत त्यात स्पष्टता आहे (आणि ती या संकल्पनेची मर्यादाही आहे). मात्र, आजचा बदलता काळ पाहता 'सेक्युलॅरिझम'बाबत आणखी सखोल अभ्यास/चर्चा होणे गरजेचे वाटते. ✿✿

सामाजिक

# 'ब्रेनड्रेन'वर उपाय काय ?

माहितीचा व ज्ञानाचा विस्फोट गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये जेवढा झाला तेवढा आजवर कधीच झाला नव्हता, असे म्हणणे ही अतिशयोक्ती ठरणार नाही. याच काळात, जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था आणि मुक्त व्यापार यांमुळे राष्ट्राराष्ट्रांमधील अर्थव्यवहार वाढले (तसेच आर्थिक विषमताही). विविध देशांमधील नागरिकांचे ज्ञान व अनेकानेक कौशल्ये यांतही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. मात्र ही वाढ सर्व देशांमध्ये समान झाली नाही. परिणामी, नागरिकांमधील ज्ञानाचा व कौशल्याचा असमतोलही वाढता राहिला. काही अविकसित/विकसनशील राष्ट्रांतील नागरिकांच्या ज्ञान व कौशल्यात वाढ झाली; मात्र त्यांच्या या वाढलेल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग विकसित राष्ट्रांनी करून घेतला आणि आपले स्थान अधिकच बळकट करून ठेवले. अलीकडचा एक नवीन अभ्यास (इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर माइग्रेशन?) असे निदर्शनास आणून देतो की, ब्रिटनमधील 'नॅशनल हेल्थ सर्व्हिस'मध्ये (एन.एच.एस.) काम करणारे २० टक्के डॉक्टर्स हे अविकसित/विकसनशील देशांमधून आलेले (immigrants) आहेत. अमेरिकेतील 'नासा' व इतर अनेक संस्थांमध्येही असे 'परदेशी' ज्ञान व कौशल्य मोठ्या प्रमाणावर आहे. यालाच 'ब्रेनड्रेन' म्हणतात.

या 'ब्रेनड्रेन'मुळे अमेरिका, ब्रिटन तसेच युरोपमधील काही देशांचा फायदा झाला आहे. मात्र, त्यामुळे अविकसित राष्ट्रांचे मोठे नुकसान झाले आहे, असे म्हटले जाते. कारण या देशांमधील असा बुद्धिवंत वर्ग चांगले काम करण्याच्या अनेक संधी व भरपूर वेतन यांमुळे विकसित देशांकडे आकर्षित झाला/होतो. परिणामी सुयोग्य मनुष्यबळाच्या अभावी अविकसित/विकसनशील देशांचा विकास पुन्हा मागेच पडतो (शिवाय अविकसित देशांचा या बुद्धिवंतांसाठी झालेला खर्च ही वेगळीच बाब होय). या सर्व बाबींमुळे विकसित देशांवर 'ब्रेनड्रेन करणारे देश' अशी टीकाही नेहमीच केली जाते. या सरकारांवर त्यांच्या देशांमधील नागरिकही टीका करत असतात. त्यामुळे विकसित देशांमधील सरकारे विविध दबावगटांना बळी पडून स्थलांतरितांच्या संख्येवर निर्बंध आणून असे स्थलांतर रोखण्याचा प्रयत्न करतात. ब्रिटनचे सरकार अशी काही

पावले उचलण्याचा विचार करीत आहे. अमेरिकेतही एच -१ बी व तत्सम व्हिसांवर संख्यात्मक नियंत्रण आणण्यात येत असतेच. पण या उपायाने 'ब्रेनड्रेन' रोखता येईल का ?

अनिवासी भारतीयांची वाढलेली संख्या पाहता 'ब्रेनड्रेन'चा हा प्रश्न भारतासाठीही महत्त्वाचा आहे. शिवाय, ब्रिटनमधील प्रसिद्धी माध्यमांमधूनही सध्या हा प्रश्न पुढे आला आहे. या संदर्भात ब्रिटनमधील 'जिऑग्राफिकल' या मासिकाने (फेब्रुवारी २००६) 'द ग्रेट ब्रेन रॉबरी' असा लेख प्रसिद्ध केला आहे.

**'कुशल स्थलांतरित'**

संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेल्या माहितीनुसार १९९० ते २००० या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्थलांतरितांची (migrants) संख्या १५ कोटी ४० लाखांवरून १७ कोटी ५० लाखांवर पोहचली आहे. यांपैकी बहुसंख्य नागरिक 'कुशल स्थलांतरित' (skilled migrants) या गटात मोडतात. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार ही 'कुशल स्थलांतरितां'ची संख्या १९९०च्या दशकात प्रतिवर्षी आठ लाख या दराने वाढली आहे. याच वेळी या स्थलांतरितांच्या विभागणीत मात्र असमतोल असल्याचे आढळले. या शतकाच्या सुरुवातीस एकूण स्थलांतरितांपैकी ६० टक्के स्थलांतरित हे विकसित देशांत वास्तव्य करून होते, त्यांतील ८५ टक्के नागरिक हे पदवी वा त्यापेक्षा जास्त शिक्षण घेतलेले असून ते अमेरिका (५० %), ऑस्ट्रेलिया व कॅनडा (२० %), ब्रिटन, जर्मनी आणि फ्रान्स (१५%) या सहाच देशांमध्ये वास्तव्यास आहेत. 'कुशल नागरिकांचे स्थलांतर' ही घटना नवी नसली तरी जागतिकीकरणामुळे त्यात भर पडली असल्याचे मत जागतिक बँकेच्या या विषयावरील अहवालाचे एक लेखक व बेल्जियम येथील विद्यापीठातील प्राध्यापक फ्रेडरिक डॉक्विअर यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणतात की जेथे उत्पादकतेचे प्रमाण जास्त आहे त्याच देशांमध्ये नव्या आर्थिक घडामोडी घडून येताना दिसतात. परिणामी, बळकट औद्योगिक क्षेत्र आणि कुशल स्थलांतरितांची मोठी फौज असलेले काही मोजके देशच पुन्हा 'कुशल स्थलांतरितां'ना आकर्षित करतात.

१९९५ ते २००२ या काळात ब्रिटनमध्ये स्थलांतरितांना देण्यात येणाऱ्या कामाच्या परवान्यांची (वर्क परमिट) संख्या २५ हजारांवरून १ लाख २९ हजारांपर्यंत वाढली. त्यात 'कुशल स्थलांतरितां'ची संख्या लक्षणीय होती. इतर विकसित देशांमध्येही असेच काहीसे घडले. उदाहरणार्थ, अमेरिकेत अशा 'कुशल स्थलांतरितां'ना देण्यात

येणाऱ्या व्हिसांची संख्या १९९२ मध्ये १ लाख १० हजार २०० इतकी होती; ती २००० मध्ये ३ लाख ५५ हजार ६०० पर्यंत वाढली. विविध क्षेत्रांमधील स्थलांतरितांबाबत जागतिक पातळीवर आकडेवारी उपलब्ध नसली तरी माहिती तंत्रज्ञान व आरोग्य ही क्षेत्रे यात आघाडीवर आहेत असे म्हटले जाते. कम्प्युटरच्या क्षेत्रात विशेष ज्ञान प्राप्त केलेल्यांना ब्रिटनमध्ये १९९५ मध्ये १८२७ वर्क परमिट देण्यात आले तर, २००१ मध्ये ही संख्या १५ हजार ८७५ एवढी वाढली. तसेच, आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील ही संख्या १७७४पासून (१९९५) २२ हजार २७१पर्यंत वाढली (२००२). याशिवाय विविध क्षेत्रांमधील संशोधक, अभियंते व शिक्षक यांचादेखील स्थलांतरणांत मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे, असे फ्रेडरिक डॉक्विअर म्हणतात.

असे असले तरी ब्रिटनमधून बाहेर पडून (emigrants) इतरत्र नोकरी करणाऱ्या 'कुशल स्थलांतरितां'ची संख्याही भरपूर असून २०००मध्ये ती १४ लाख एवढी होती. इतर देशांमधेही ती लक्षणीय अशीच आहे. उदाहरणार्थ, जर्मनी (८,५०,०००), कॅनडा (५,१५,०००) आणि अमेरिका (४,३०, ०००). तर मध्यम उत्पन्न गटातील राष्ट्रांमधील ही संख्या फिलिपिन्स ( ११ लाख), भारत (१० लाख), मेक्सिको (९,२०,०००) आणि चीन (८,१५,०००) एवढी आहे. बहुतेकदा, देशांतर्गत श्रमांच्या बाजारपेठेत बरेचदा जाणवणाऱ्या काही कौशल्यांच्या तुटवड्याची भरपाई हे असे बाहेरून येणारे स्थलांतरित करत असतात. त्यामुळे त्याचे फायदे जास्त असतात. उदाहरणार्थ, अमेरिकेतून बाहेर पडलेल्यांच्या तुलनेत तेथे ८२ लक्ष उच्चशिक्षित 'कुशल स्थलांतरित' आहेत, कॅनडात ही संख्या २० लाख, जर्मनीत १५ लाख तर ब्रिटनमध्ये १ लाख अशी आहे.

फ्रेडरिक डॉक्विअर यांच्या मते 'ब्रेनड्रेन' होणे वा न होणे हे साधनसामग्रीच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, आकारमानाने लहान असणाऱ्या हैती, ग्रेनेडा, ग्वाना, जमैका यांसारख्या देशांमधील कुशल कर्मचाऱ्यांपैकी ८० टक्के कर्मचाऱ्यांनी स्थलांतर केले आहे. पण यामुळे 'ब्रेनड्रेन' होते किंवा कसे हे नेमकेपणाने सांगणे कठीण आहे. कारण, हे देश अतिशय लहान असून त्या देशांतर्गत परिस्थिती अशा कर्मचाऱ्यांना नोकऱ्यांमध्ये सामावून घेऊ शकण्याइतपत सक्षम असते का, ही शंका उपस्थित होते. मात्र ज्या देशांमध्ये लोकसंख्येचे प्रमाण प्रचंड आहे त्या देशांची परिस्थिती वेगळीच असते. हैतीमधील कुशल कर्मचाऱ्यांपैकी ८४ टक्के कुशल कर्मचारी परदेशांमध्ये वास्तव्यास गेले आहेत. आफ्रिकेतील अन्य देशांमध्ये जवळपास अशीच परिस्थिती आहे - घाना (४६.९ %), मोझांबिक (४५.१ %), केनिया (३८.४ %), युगांडा

(३५.६ %) आणि अंगोला (३३ %), ही याची काही उदाहरणे. लाओस, एल-साल्व्हाडोर, श्रीलंका, निकारागुआ या देशांमधून बाहेर पडणाऱ्यांचा (emigrants) दर ३० टक्क्यांच्या आसपास आहे. त्या तुलनेत फिलिपिन्स १३. ७ टक्के, आणि भारत ४.३ टक्के असे हा दर आहे. ब्रिटनमध्ये हा दर १६.७ टक्के तर अमेरिकेत ०.५ टक्के इतका आहे.

काही श्रीमंत देश हे विकसनशील राष्ट्रांमधील मनुष्यबळरूपी भांडवल आपल्याकडे खेचून घेऊन त्या देशांचे नुकसानच करीत आहेत, असे या आकडेवारीवरून सूचित होते, असा काहींचा दावा आहे. विकसनशील देशांमधील नागरिकांच्या जोरावरच श्रीमंत राष्ट्रे अधिक श्रीमंत व बळकट होत आहेत अशी नवसाम्राज्यशाहीवादी भूमिका मांडणाऱ्यांच्या भूमिकेशी सुसंगत अशीच ही आकडेवारी ठरते. ब्रिटनमधील अनेक प्रसारमाध्यमांनी याच पद्धतीने हा विषय पुढे आणला आहे. पण वस्तुस्थिती एवढी सोपी नाही.

**'ब्रेनड्रेन'चे परिणाम**

गेल्या चाळीस वर्षांपासून 'ब्रेनड्रेन'ची कारणे आणि त्याचे परिणाम यांबाबत ऊहापोह करण्यात येत आहे, पण त्याचे परिणाम अभ्यासण्यासाठी आवश्यक असणारी विश्वासार्ह आकडेवारी मात्र फारशी उपलब्ध झालेली नाही. 'ब्रेनड्रेन' मुळे परदेशांत गेलेल्या कुशल स्थलांतरितांचा व्यक्तीशः फायदा होत असला/झाला असला तरी त्यामुळे त्यांच्या मायदेशाला कितपत फायदा होतो ? काही अर्थतज्ज्ञांच्या मते या स्थलांतरितांनी मायदेशी पाठविलेला पैसा व काही नवे व्यापारी संबंध यांमुळे त्या देशाचा फायदा होतो. पण अनेकांनी याबाबत शंका व्यक्त केली आहे. 'ग्लोबल कमिशन ऑन इंटरनॅशनल माइग्रेशन'च्या अहवालात असे नोंदविण्यात आले आहे की स्थलांतरितांनी मायदेशी पाठविलेल्या पैशामुळे त्यांच्या कुटुंबांचा आर्थिक फायदा झाला तरी देशाचे हित मात्र साधले जात नाही.

पूर्व आशियातील काही देशांमधून १९५० ते १९६० या काळात बाहेर पडलेल्या (emigrants) स्थलांतरितांनी अमेरिकेत जाऊन अनेक कौशल्ये व कल्पना आत्मसात केल्या आणि मायदेशी परतून त्यांचा व्यवहारांत अवलंब केला. त्यामुळे त्या काळात या देशांची वेगाने प्रगती झाली. पण दरवेळी असे घडतेच असे नाही. आता परिस्थिती बदलली असून परदेशी गेलेले अनेक नागरिक मायदेशी परत येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या मायदेशाचा विकास होत नाही.

आफ्रिका दरवर्षी किमान एक लाख पाश्चिमात्य तज्ज्ञांचे तांत्रिक साहाय्य घेण्यासाठी ४०० कोटी अमेरिकन डॉलर खर्च करते. पण हे काम तेथील नागरिकांनाही करता येण्यासारखे असते. पण त्यांना त्याचे ज्ञान नसते. शेवटी 'ज्ञाना'च्या इंजिनामुळेच देशाची आर्थिक प्रगती होत असते.

'न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखात म्हणण्यात आले आहे की, इतर देशांतील डॉक्टरांच्या तुलनेत, परदेशी जाणाऱ्या भारतीय डॉक्टरांची संख्या अधिक आहे. २००२मधील आकडेवारीनुसार भारतातील ६० हजार डॉक्टर्स ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्रिटन आणि अमेरिका येथील आरोग्यसेवेत गुंतलेले आहेत. त्यानंतर फिलिपिन्स (१८,३००), पाकिस्तान (१२,८००) आणि ब्रिटन (१०,८००) असा क्रम लागतो. पण आरोग्यसेवेचा विचार करता या देशांना 'ब्रेनड्रेन'चा प्रश्न जाणवत नाही. कारण भारतातील डॉक्टरांची संख्या पाहता परदेशी जाणाऱ्या डॉक्टरांचे प्रमाण १०.६ टक्के एवढेच आहे. त्या तुलनेने ते पाकिस्तानात ११.७, फिलिपिन्समध्ये १६.७ आणि ब्रिटनमध्ये फक्त ७.२ एवढे आहे. शिवाय लोकसंख्येच्या तुलनेत तेथे डॉक्टरांची संख्याही तुलनेने जरा बरी आहे. भारतात दर १ लाख नागरिकांमागे ५९ डॉक्टर आहेत, पाकिस्तानमध्ये ७३ आणि फिलिपिन्समध्ये हेच प्रमाण ११६ आहे. हे प्रमाण दर १ लाख नागरिकांमागे २० डॉक्टर असे असावे, असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे. सब-सहारन आफ्रिकेत मात्र अवघ्या ८२ हजार डॉक्टरांना ६५ कोटी नागरिकांसाठी आरोग्यसेवा पुरवावी लागते. म्हणजे दर १ लाख नागरिकांच्या मागे फक्त १२ डॉक्टर तेथे आहेत. शिवाय या देशांमधून परदेशी जाणाऱ्या डॉक्टरांचे प्रमाणही इतर देशांच्या तुलनेत जरा जास्त -१४टक्के - एवढे आहे. घानाची स्थिती आणखीनच वाईट असून तेथे दर १ लाख नागरिकांमागे फक्त ९ डॉक्टर आहेत.

**'ब्रेनड्रेन' रोखायचा कसा ?**

आतापर्यंत 'ब्रेनड्रेन' रोखण्याचे प्रयत्न दोनच प्रकारे करण्यात आले आहेत. एक म्हणजे स्थलांतरणावर नियंत्रण ठेवणे आणि दोन म्हणजे स्थलांतरितांना नोकऱ्यांवर ठेवण्यासंदर्भातील नियम अधिक कडक बनविणे. ब्रिटनचा विचार करता तेथील आरोग्य विभागाने २००३ सालची आचारसंहिता अधिक कडक केली आहे. डॉक्टर व नर्स यांच्या आंतरराष्ट्रीय मंडळांनीदेखील अशीच धोरणे अंमलात आणण्याचे ठरविले आहे. राष्ट्रकुल परिषदेच्या सचिवालयानेही अशीच आचारसंहिता आखली आहे. पण

नॅशनल हेल्थ सर्व्हिसला आलेल्या अनुभवानुसार स्थलांतर रोखण्यासाठी अशा कृती पुरेशा ठरत नाहीत. असे करणे हे मानवाधिकारांचे उल्लंघन आहे, असे मानले जाऊ शकते. दुसरा एक उपाय असा सुचविण्यात आला आहे की ज्या देशांना कुशल कर्मचाऱ्यांच्या स्थलांतराचा लाभ होतो त्यांनी त्या कर्मचाऱ्यांच्या मायदेशांना नुकसान भरपाई द्यावी. पण कदाचित हेही पुरेसे ठरणार नाही. मग काय करावे ?

ब्रिटनमधे हा प्रश्न अशा काही मुद्यांभोवती अडकला आहे. तेथील काही प्रसिद्धीमाध्यमांच्या मते 'ब्रेनड्रेन'चा हा प्रश्न 'स्थलांतरा'शी संबंधित आहे. पण त्यासंदर्भात 'जिऑग्राफिकल'मधील लेखाचे मत वेगळे आहे. हा प्रश्न केवळ 'स्थलांतर' या विषयापुरताच मर्यादित नाही, असे त्या लेखात म्हटले आहे. 'ब्रेनड्रेन'ची बीजे ब्रिटन, अमेरिका वा इतर विकसित देशांमध्येच आहेत, असे नाही; तर, ती अविकसित देशांच्या गरिबीत आणि त्यांच्या ठयीच्या विकासाच्या अभावात रुजलेली असल्याने स्थलांतरितांच्या संख्येवर निर्बंध घालणे हा 'ब्रेनड्रेन' रोखण्याचा उपाय नसून अविकसित देशांचा विकास घडवून आणणे हाच त्यावरील उतारा होय, असे प्रतिपादन यात करण्यात आले आहे. हा विकास घडवून आणण्यासाठी व्यापारावरील निर्बंध हटविणे आणि शास्त्रज्ञ, विविध व्यावसायिक क्षेत्रांतील सुशिक्षित नागरिक आपल्याच देशात राहावेत यासाठी संबंधित क्षेत्रांत तसे चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी अनेक प्रकारे गुंतवणूक करणे, हे आवश्यक आहे, अशी पुस्तीही जोडण्यात आली आहे. असे केल्याने परदेशांत गेलेले नागरिकही भविष्यात मायदेशी परतण्यास तयार होऊ शकतात. याला 'रिव्हर्स ब्रेनड्रेन' म्हणतात (भारतात असे घडण्यास सुरुवात झाली असल्याचे म्हटले जाते).

खरे तर, 'जिऑग्राफिकल'मधील या लेखात मांडलेल्या भूमिकेबाबत दुमत असण्याचे कारण नाही. पण 'ब्रेनड्रेन' रोखल्याने विकास होईल की विकास केल्याने 'ब्रेनड्रेन' रोखला जाईल, हा प्रश्न 'कोंबडी आधी की अंडे ?' या प्रश्नासारखा आहे आणि हाच तर खरा कळीचा मुद्दा आहे. कदाचित या दोन्ही प्रक्रिया एकदम घडाव्या लागतील. किंबहुना, या दोन्ही प्रक्रिया एकदम घडत असल्यामुळेच सध्या भारताची काही क्षेत्रांत, विशेषतः माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, घोडदौड चालू आहे असे म्हणता येईल का ?

✿✿

# कामगार सुधारणांची पंचसूत्री

'कामगार सुधारणा' हा अलीकडील काळात परवलीचा शब्द बनला आहे. केवळ भारतातच नव्हे तर जगभरच ! जागतिकीकरणाच्या माध्यमातून देशोदेशींच्या बाजारपेठांची परस्परांत गुंफण झाल्याने एकूणच स्पर्धा तीव्र होण्याबरोबरच या जागतिक स्पर्धेचे प्रमाणही वाढले आहे. या अशा एकात्म जागतिक बाजारपेठेत पाय रोवून उभे राहण्यासाठी उत्पादनांच्या किंमती स्पर्धात्मक राखण्याबरोबरच या उत्पादनांचा दर्जाही अव्वल असणे जरूरीचे बनले आहे. या उभय बाबी, व्यापक अर्थाने, उत्पादक प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग असणाऱ्या 'कामगार' या घटकाच्या गुणात्मकतेवर निर्भर आहेत. त्यामुळेच, जगभरातील अनेक देशांमध्ये कामगार सुधारणांना गेल्या सुमारे दोन-अडीच दशकांत वेग आला असल्याचे अनुभवास येते.

भारतामधील परिस्थिती मात्र यापेक्षा अंमळ निराळी आहे. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवली जाऊन आता जवळपास दीड दशक उलटून गेले तरी कामगार क्षेत्रातील सुधारणांचे सूतोवाच करण्यासही कोणतेही सरकार अजून तयार नाही. सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्यात आता कामगार विश्वात पुनर्रचना आणि सुधारणा पर्वाचा आरंभ करण्याबद्दल विविध व्यासपीठांवरून चर्चा होते, मात्र प्रत्यक्षात फार काही घडताना दिसत नाही. किंबहुना, देशात अलीकडील १० वर्षांत अनुभवास येत असलेल्या 'जॉबलेस ग्रोथ'च्या प्रक्रियेस पायबंद घालावयाचा असेल तर मुख्यतः उद्योगासारख्या वस्तुनिर्मिती क्षेत्रातील रोजगारवाढीस चालना देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन वारंवार केले जाते. परंतु, औद्योगिक कलह कायद्यातील बदल आणि कामगार भरती वा कामगार कपात यांबाबत उद्योगव्यवसायांना लवचीक धोरण अवलंबण्याबाबत मुभा म्हणजेच कामगार क्षेत्रातील सुधारणा, असे एक समीकरणच जणू तयार झालेले असल्याने याबाबतीत सरकारने पुढे एक पाऊल जरी उचलले तरी विरोधाचा स्वर बुलंद बनतो.

मात्र, हे असे केवळ भारतातच घडते आहे, असेही समजण्याचे कारण नाही. जगभरातील विविध देशांमधील परिस्थिती फारशी वेगळी नाही. परंतू, अन्य देशांमध्ये

कामगार सुधारणांचा श्रीगणेशा तरी झालेला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. कामगार क्षेत्रातील सुधारणांबाबत या देशांमध्ये वादविवाद झडतातच परंतु ते अशा सुधारणांच्या पुढील टप्प्याची दिशा काय असावी, सुधारणांचा प्राधान्यक्रम काय असावा, याबाबत. उदाहरणार्थ, जर्मनीतील कामगार क्षेत्रात सक्रिय असणाऱ्या कामगार संघटनांच्या नेत्यांचा असा दावाच आहे की जर्मनीत आजवर राबविले गेलेले अवघे 'लेबर रीफॉर्म्स' म्हणजे केवळ पोकळ आश्वासनांची जंत्रीच होती ! त्यामुळे सरकारने आता कामगार क्षेत्रातील सुधारणांच्या पुढील पर्वाचे ऐलान करण्याआधी (वा त्याऐवजी) वेतनवाढ लागू करण्याबरोबरच शिक्षण तसेच पायाभूत सुविधांवरील गुंतवणूकीस चालना द्यावी असा मतप्रवाह तेथे जोर धरत आहे.

'जॉबलेस ग्रोथ'ची समस्या जगात थोड्याफार फरकाने सर्वत्रच आपले अस्तित्त्व जाणवून देते आहे. त्यातच युरोप, अमेरिका, जपान यांसह एकंदरच पश्चिमी अर्थव्यवस्था एकविसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धदशकात तेजी-मंदीच्या चक्रातून वाटचाल करीत पुढे सरकल्या. साधारणपणे, २००३-०४ सालानंतर या अर्थव्यवस्थांची चक्रे पुन्हा एकवार गतिमान होऊन भिरभिरू लागलेली असली तरी, उत्पन्न-उत्पादनातील ही ऊर्जितावस्था (त्याच प्रमाणात) रोजगारवाढीमध्ये मात्र परावर्तित झालेली नाही. तसेच, पाश्चिमात्य देशांमधील लोकसंख्येची जडणघडणही लक्षणीयरीत्या पालटत आहे. प्रौढत्वाचा टप्पा ओलांडून वृद्धत्वाकडे झुकलेल्या कामगारांचे एकूणांतील प्रमाण वाढत आहे. या कामगारांच्या निवृत्तीवेतनाची तरतूद करण्यातून सरकार तसेच सार्वजनिक कल्याण व्यवस्थांवरील ताणात भर पडते आहे. त्याच वेळी अर्थव्यवस्थेतील श्रमांच्या बाजारपेठेत नव्याने दाखल होणाऱ्या होतकरू नवकामगारांकडूनही रोजगाराची मागणी वाढते आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया जगभरात सर्वत्रच गतिमान झालेली असल्याने भांडवलाप्रमाणेच आता श्रमिकांच्या स्थलांतरणाचे प्रमाणही वाढते आहे. त्यामुळे श्रमांच्या स्थानिक बाजारपेठेत (देशांतर्गत) स्पर्धा अधिकच तीव्र होऊ लागली आहे. अर्थव्यवस्थांचा तोंडवळाही बदलत आहे. वस्तुनिर्माण क्षेत्रांपेक्षा सेवाक्षेत्रांचे प्राबल्य विस्तारते आहे.

या साऱ्याच पार्श्वभूमीवर, कामगार सुधारणांचा विषय युरोपीय समुदायासह विविध देशांमध्ये ऐरणीवर येऊ पाहत आहे. केवळ इतकेच नाही तर, या अशा संक्रमणकालीन वातावरणात 'लेबर रीफॉर्म्स' या संकल्पनेचा पैस नेमका काय असावा, याबाबत पश्चिमी अर्थव्यवस्थांमध्ये व्यापक मंथन सुरू आहे. जागतिकीकरण, जागतिक

पातळीवरील श्रमविभागणीमध्ये घडूण येत असलेले बदल, तंत्रज्ञानातील प्रगती या साऱ्या घटकांचे उचित भान राखत देशादेशांत मनुष्यबळविकासविषयक जी धोरणे वेळोवेळी आखली जात आहेत, त्यांच्याशी कामगार क्षेत्रातील सुधारणांची सांगड घातली जावी, असाही एक सूर आहे. मग, 'कामगार सुधारणा' या संज्ञेचा अर्थ कामगारांची भरती आणि कपात याबाबत उद्योग-व्यवसायांना लवचीक धोरण अवलंबण्याबाबत मोकळीक देणे, इतपर्यंतच सीमित ठेवावयाचा का, असे करणे हे कितपत संयुक्तिक आहे, असा प्रश्नही आज तिथे विचारला जातो आहे.

मात्र, कामगार सुधारणांबाबत आजमितीस युरोपीय समुदायात घडून येत असलेले विचारमंथन खरोखरच अभ्यसनीय आहे. विशेषतः, २००४सालच्या मे महिन्यात एकूण २५ देशांचा नव्याने अंतर्भाव होऊन समुदायाचा जो एक मोठा विस्तार घडून आला त्यानंतर तर कामगार क्षेत्रातील सुधारणांच्या या मुद्याबाबत समुदायात पुन्हा एकवार जोराने विचारविमर्श घडून येत आहे. २००३-०४ या वर्षानंतर युरोपीय समुदायातील देशांच्या अर्थव्यवस्थांना ऊर्जितावस्थेचे वारे अनुभवास येत आहेत. मात्र रोजगार निर्मितीतील वाढ अजूनही रखडलेलीच आहे. कामगार क्षेत्रातील सुधारणांबाबतच्या तेथील सध्याच्या चिंतनाचे दोन विशेष जाणवितात. कामगार सुधारणांचा विचार स्वायत्तपणे करण्यापेक्षा अर्थकारणातील अन्य आनुषंगिक सुधारणांच्या 'कॅनव्हास'वर या सुधारणांचा विचार केला जावा, ही बाब तेथे अधोरेखित केली जाते आहे. अर्थव्यवस्थेतील व्यापार, उद्योग, चलनव्यवस्था, वित्तव्यवहार, करप्रणाली यांसारख्या अन्य क्षेत्रांमध्ये ज्या सुधारणा घडवून आणल्या जात आहेत त्यांच्याशी कामगार क्षेत्रातील सुधारणांचा सांधा जुळलेला राहील याबाबत दक्षता बाळगली जावी, यावर युरोपीय समुदायात कटाक्ष राखला जात आहे. हा झाला पहिला विशेष. दुसरे म्हणजे, कामगार सुधारणा ही स्वरूपतःच एक गतिमान अशी बाब आहे आणि म्हणूनच बदलत्या आर्थिक वास्तवाचे भान राखत या सुधारणा सतत पुढे जात राहिल्या पाहिजेत, ही जाणीव तेथील विचारविश्वात स्थिरावलेली आहे.

कामगार सुधारणा या संकल्पनेचा जो पैस युरोपीय समुदायाने आपल्या नजरेसमोर ठेवलेला आहे, त्याचा परिचय या पार्श्वभूमीवर करून घ्यावयास हवा. युरोपीय समुदायाने या संदर्भात अंगीकारलेली पंचसूत्री अशी आहेः

(१) श्रमांच्या बाजारपेठेतील विविध संस्था, प्रणाली, व्यवस्था या कामगारांच्या गरजांशी सुसंवादी राहतील याची काळजी घेणे. रोजगारविषयक सेवा पुरविणाऱ्या संस्था,

शिक्षण-प्रशिक्षण प्रणाली व व्यवस्था, तंत्रशिक्षणाच्या सुविधा, कामगारांना मिळवयाच्या विविध लाभांचे निर्धारण करणाऱ्या प्रणाली यांचा यात अंतर्भाव होतो.

(२) वयस्कर कामगार, महिला, अल्पशिक्षित, अकुशल-अर्धकुशल कामगार, अल्पसंख्याक, स्थलांतरित कामगार, शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती यांसारख्या श्रमशक्तीमधील तुलनेने कमकुवत घटकांना संरक्षण पुरविणे. एकंदर श्रमिकांमधील या घटकांची रोजगारक्षमता टिकविणे-वाढविणे, त्यांच्यासाठी पुरेशा रोजगारसंधींची निर्मिती करण्यावर भर देणे, या श्रमिकांचा असलेला रोजगार टिकविणे, त्यांचा रोजगार टिकाऊ बनावा यासाठी विशेष काळजी घेणे, श्रमांच्या बाजारपेठेतील बदलत्या प्रवाहांमधून तरून जाण्याच्या क्षमता या घटकांच्या अंगी विकसित व्हाव्यात यासाठी अनुरूप अशी धोरणे तयार करणे व राबविणे.

(३) श्रमांच्या बाजारपेठेत लवचिकता आणि रोजगारविषयक सुरक्षितता या उभय बाबींचा सुयोग्य मेळ साधणे. कामगारांच्या ठायी असणाऱ्या उत्पादकतेचे संगोपन-संवर्धन आणि उत्पादनांची गुणवत्ता उच्च दर्जाची राखणे या दोन्ही बाबींना चालना देणे. व्यक्तिगत पातळीवर कामगाराचे आणि व्यावसायिक पातळीवर उद्योजकाचे अशा उभयतांचे हित जपण्याची भूमिका या ठिकाणी आहे. कामगारांना व्यक्तिगत स्तरावर रोजगाराची हमी देत असतानाच, उद्योग-व्यवसायांना कामगारांच्या भरती व कपातीसंदर्भात आवश्यक ती लवचिकता प्रदान करण्याचा हेतू यामागे दिसतो. त्याद्वारे नवनवीन उद्योग-व्यवहारांच्या स्थापना व विस्तारातून नवीन रोजगारसंधींचे दरवाजे खुले होण्याचा मार्ग प्रशस्त बनावा, हे अपेक्षित आहे.

(४) उच्च दर्जाची व्यावसायिक कौशल्ये तसेच प्रशिक्षणाची मागणी करणाऱ्या सेवा क्षेत्रातील रोजगार संधींच्या विस्तारास वाव. या रोजगारसंधींचा लाभ उठविण्याची पात्रता होतकरूंच्या अंगी तयार व्हावी यासाठी उच्च शिक्षण तसेच संशोधनातील गुंतवणूक वाढविण्यावर भर देणे. सार्वजनिक तसेच व्यक्तिगत स्तरावर सेवांचा उपभोग व मागणी वाढावी यासाठी प्रयत्न करणे.

(५) जागतिकीकरणाच्या वाऱ्यांचा लाभ उठविण्याच्या दृष्टीने अर्थकारणातील विविध घटकांना प्रेरणा देणे.

कामगार क्षेत्रातील सुधारणांसंदर्भात युरोपीय समुदायाने अंगीकारलेल्या या पंचसूत्रीपासून भारताला काही शिकता येईल का ?

*(संदर्भ - एम्प्लॉयमेन्ट इन युरोप २००४-०५: रिसेन्ट ट्रेन्डस् अँड प्रॉस्पेक्ट्स् )* ✿✿

प्रसिद्ध झाला! प्रसिद्ध झाला!

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

- मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.
- नामवंत डॉक्टर ह. वि. सरदेसाई यांची प्रस्तावना
- मानवी मेंदूची उत्क्रांती, गर्भावस्थेतील बालकाच्या मेंदूचा विकास, त्याच्या वाढीसाठी आवश्यक असणारा आईचा आहार, तसेच शिक्षण, बहुविध बुद्धिमत्ता, भाषा, भावना, अभिनय व कलानिर्मिती, होल ब्रेन थिंकिंग, व्यायाम, जैविक घड्याळ, श्रद्धा आणि आधुनिक काळातील कृत्रिम बुद्धिमत्ता व ग्लोबल ब्रेन असे नानाविध विषय.
- आकर्षक मुखपृष्ठ, सात विभाग, प्रत्येक विभागाचे एक रंगीत सेपरेटर, मेंदूच्या वाढीची तसेच त्याच्या विविध कार्यांची माहिती देणारी आठ मोठी रंगीत चित्रे
- उद्‌बोधक अशी ५० पेक्षा अधिक चित्रे. मेंदूविषयक अन्य रोचक माहिती पानोपानी. सुमारे ७० संशोधकांच्या आधुनिक संशोधनाचा संदर्भ.

**माहितीच्या युगात ज्ञानाचे नवे दालन**

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**

**सवलतीत ग्रंथविक्री योजना - सवलतीची किंमत २७५/- रुपये, सवलतीसाठी अंतिम मुदत ३१ मे २००६.**

**रुपये ३५०/- भरून ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका एक वर्ष विनामूल्य. प्रकाशक /संपर्क : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, पुणे.**

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

## अंतरंग


**प्रस्तावना**

१ आपण आणि आपला मेंदू
डॉ. ह. वि सरदेसाई

२ क्रांतिकारक मेंदूसंशोधन
रमेश पानसे

**इतिहास व उत्क्रांती**

१. मेंदूची उत्क्रांती

२ असा आहे आपला मेंदू

३ व्यक्तिमत्व व जनुकांचे कार्य

**जडणघडण**

४ गर्भावस्थेतील जडणघडण

५ बालमेंदू संगोपन

६ भाषाशिक्षणाचा उगम

७ बुद्धिवर्धक आहार

**विचारनिर्मिती**

८ भावनांची निर्मिती

९ हातवारे-हावभाव आणि विचार

१० मूक अभिनयातून भाषेची उत्क्रांती

११ विचारनिर्मिती

१२ होल ब्रेन थिंकिंग

१३ कलानिर्मिती

**शिक्षण**

१४ बहुविध बुद्धिमत्ता

१५ नादलहरींच्या हिंदोळ्यावर

१६ मेंदूसंशोधन व शिक्षण

**जैविक घड्याळाचे केंद्र**

१७ जैविक घड्याळ

१८ जनुकीय आजार

१९ चेहरे ओळखण्याचे केंद्र

२० संप्रेरकामुळे येणारे स्थूलत्व

२१ व्यायाम वाढवी मेंदूची
कार्यक्षमता

२२ बुद्धिमान पक्षी

**जाणिवांच्या शोधात...**

२३ जाणिवांचे विज्ञान

२४ जाणिवांचा उगम

२५ ध्यानधारणेतील मेंदूसंशोधन

२६ श्रध्देला मरण का नाही?

**कृत्रिम बुद्धिमत्ता**

२७ कृत्रिम बुद्धिमत्तेकडे....

२८ ग्लोबल ब्रेन

# राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना परिणामकारक ठरण्यासाठी.....

देशाच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास एका वित्तीय वर्षात किमान १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देण्याची हमी देणारा कायदा अस्तित्त्वात आणून केंद्र सरकारने एका अतिशय विशाल आणि तितक्याच महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा श्रीगणेशा केला आहे. ग्रामीण भागात आढळून येणाऱ्या बेरोजगारीवर (यातही पुन्हा मुख्य समस्या असते ती छुप्या बेरोजगारीची) आणि त्यातून निपजणाऱ्या दारिद्र्यावर उतारा शोधण्याचा हा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील रोजगारीचा विचार करीत असताना मुख्य भान ठेवावे लागते ते अकुशल हातांना काम देण्याचे. ही बाब ध्यानात घेऊनच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा भर हा अकुशल आणि अंगमेहनतीच्या कामांद्वारे रोजगार निर्मितीवर आहे. या कायद्यामध्ये बेरोजगार भत्ता अदा करण्याचीही तरतूद आहे. ग्रामीण भागातील रोजगारेच्छूंना सामाजिक सुरक्षेचे काही किमान कवच पुरविण्याचा हा एक पर्याय आहे. या योजनेच्या अंमलबजावणीद्वारे ग्रामीण भागांत सार्वजनिक उपयोगाच्या मालमत्तेची, साधन-सुविधांची निर्मिती व्हावी आणि त्या माध्यमातून शेती तसेच एकूणच ग्रामीण अर्थकारणातील महत्त्वाच्या क्षेत्रांची उत्पादकता वाढण्यास हातभार लावावा, हाही दृष्टिकोण आहे.

महाराष्ट्रात ७०च्या दशकात साकारलेल्या रोजगार हमी योजनेच्या अनुभवावर या व्यापक योजनेची आखणी झालेली असली तरी, महाराष्ट्राने राबविलेली रोजगार हमी योजना आणि ही नवीन योजना या दोहोंत काही मूलभूत फरक आहेत. महाराष्ट्रात तामिली झालेल्या रोजगार हमी योजनेची कार्यवाही, त्या कार्यवाहीतील त्रुटी, योजनेची फलश्रुती, परिणामकारकता, संबंधित घटकांना या योजनेचे मिळालेले लाभ यांसारख्या बाबींसंदर्भात वेळोवेळी अभ्यास झालेले आहेत. या पैलूंबाबत मुबलक दस्तावेजही उपलब्ध आहेत. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी ही आताशा कोठे गेल्या २ फेब्रुवारी २००६पासून देशातील २०० जिल्ह्यांमध्ये सुरू झाली आहे. या कायद्याची उपयुक्तता, या योजनेची परिणामकारकता, अपेक्षित लाभ,

अंमलबजावणीदरम्यानची आव्हाने यांचा यथावकाश मागोवा घेतला जाईल. योजनेचे मूल्यमापनही योग्य वेळी होईलच. परंतु, या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची अपेक्षित फलश्रुती, या योजनेची परिणामकारकता ज्या विविध बाबींवर अवलंबून आहे अशांचा ऊहापोह करणे, या योजनेच्या यशस्वी कार्यवाहीशी संलग्न असणाऱ्या पैलूंबाबतच्या साधकबाधक चर्चेस चालना देणे हे जितके आवश्यक आहे तितकेच ते अगत्याचेही आहे. केवळ इतकेच नाही तर, या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील काही महत्त्वाच्या तरतूदींचे व्यवहारात प्रत्यक्ष काय परिणाम संभवतात, या योजनेचा देशाच्या एकंदर विकास प्रक्रियेवर कोणता प्रभाव पडेल यांसारख्या मुद्यांचाही परामर्श घ्यावयास हवा. कारण त्यातूनच या कायद्यात तसेच या उपक्रमाच्या रचनेत कालांतराने काही बदल अथवा सुधारणा करणे आवश्यक ठरले तर त्या सुधारणांची दिशा काय असावी यांबाबतही काही प्रमाणात स्पष्टता येण्यास हातभार लागेल. अशा काही पैलूंची चर्चा प्रस्तुत लेखात केली आहे.

ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांतील, काम करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीला काही किमान मजुरीदराने वर्षातील काही किमान दिवस काम पुरविण्याची हमी या कायद्याने दिलेली आहे. मात्र, अशा रोजगारेच्छू व्यक्तीने रोजगाराची मागणी करणारा अर्ज लेखी स्वरूपात ग्रामपंचायतीच्या कार्यालयात दाखल करणे कायद्याने बंधनकारक आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने असा अर्ज दाखल करून 'सेल्फ आयडेन्टिफिकेशन' करावे, अशी यामागील भूमिका आहे. रोजगाराची गरज व काम करण्याची निखळ इच्छा असणारी गरजू व्यक्तीच या योजनेचा लाभ घेण्यास या प्रक्रियेद्वारे पुढे येईल, असा यामागील विचार. रोजगाराची मागणी करणारा असा अर्ज इच्छुक लाभार्थीने ग्रामपंचायतीच्या कार्यालयात रीतसर दाखल केल्यानंतर पंचायतीने त्यास त्याच्या अर्जाची लेखी पोचपावती देणेही कायद्याने आवश्यक आहे. या ठिकाणी मग प्रश्न उभा राहतो तो हा, की ही सारी लिखापढी खरोखरच आवश्यक आणि अनिवार्य आहे का ?

योजनेचा लाभ खऱ्याखुऱ्या गरजूंनाच मिळावा, काम देण्यामध्ये दिरंगाई होऊ नये, अनियमिततांना वाव राहू नये यासाठी काही प्रमाणात कागदोपत्री व्यवहार व दस्तावेजांची पूर्तता ही आवश्यक असली तरी यामुळे अनावश्यक कागदी घोडे नाचविले जाऊ नयेत, याचीही दक्षता घेणे गरजेचे आहे. कारण, अशी ही लिखापढी हाच योजनेच्या कार्यक्षम कार्यवाहीतील एक अडसर बनण्याची भीती असते. विशेषतः,

ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण ध्यानात घेता तर ही बाब अधिकच महत्त्वाची ठरते. महाराष्ट्रासारख्या देशातील एका (तुलनेने) पुढारलेल्या राज्यात कदाचित चित्र वेगळे दिसेल. परंतु, ज्या राज्यांमध्ये साक्षरतेचे सरासरी प्रमाण अजूनही कमीच आहे, तिथे ही बाब लक्षात घ्यावी लागेल. त्यातही पुन्हा आपल्या देशात साक्षरतेच्या सरासरी प्रमाणात 'शहरी' आणि 'ग्रामीण' यांतील तफावत मोठीच आहे. अशा परिस्थितीत, रोजगाराची मागणी लेखी स्वरूपातच नोंदविणे हे कायद्याने बंधनकारक आहे म्हणून या योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित राहण्याची वेळ गरजू लाभार्थींवर येत नाही ना, हे पाहणे अगत्याचे ठरते.

या संदर्भातील महाराष्ट्राचा दाखला पुरेसा मार्गदर्शक ठरावा. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेमध्येही इच्छुक लाभार्थीने रोजगाराची मागणी लेखी स्वरूपातच नोंदविणे आरंभापासूनच अपेक्षित आहे. मात्र, अशा प्रकारे लेखी अर्ज दाखल करण्याबाबत ग्रामीण भागात सर्वसाधारणपणे उदासीनताच आढळून येते, हे महाराष्ट्र सरकारच्या लवकरच ध्यानात आले. रोजगारेच्छूंनी रोजगाराची लेखी मागणी नोंदविण्यासंदर्भातील महाराष्ट्राचा अनुभव हा प्रथमपासूनच उत्साहवर्धक नाही. तसेच, रोजगार मिळावा यासाठी इच्छुक लाभार्थीने सरकारदरबारी लेखी अर्ज दाखल करणे, संबंधित सरकारी यंत्रणेने असा अर्ज मिळाल्याची पोचपावती लेखी स्वरूपात त्यास अदा करणे, ही सारी लिखापढी वेळखाऊ ठरण्याची शक्यता तर पुन्हा वेगळीच ! हे सारे सव्यापसव्य टाळता येणार नाही का ?

यासाठी पर्यायी व्यवस्था करणे अवघड नाही. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ ग्रामीण भागांतील खऱ्या गरजूंनाच मिळावा, लिखापढीच्या अनिवार्यतेपायी या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची पाळी इच्छूकांवर येऊ नये आणि त्याच वेळी या योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान गैरव्यवहार, अनियमितता यांस किमान वाव राहावा यादृष्टीने पुढील व्यवस्था राबविणे शक्य आहे:

(१) ग्रामसभेची बैठक बोलावून या योजनेची तपशीलवार माहिती ग्रामस्थांना देणे.

(२) या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची नावे लगोलग त्या बैठकीदरम्यानच नोंदवून घेणे.

(३) इच्छूक उमेदवारांच्या स्वाक्षऱ्या अथवा अंगठ्याचे ठसे घेणे.

(४) कामाचे प्रत्यक्ष वाटप करताना दवंडी देऊन ग्रामसभेची बैठक बोलाविणे.

(५) योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामाच्या तपशीलासह योजनेत सहभागी

होऊन रोजंदारीवर येणाऱ्या लाभार्थींची नावे ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर चिकटविणे.

(६) प्रत्यक्ष कामावर रुजू होणाऱ्या लाभार्थींची नावे जाहीररीत्या वाचून त्यांच्या स्वाक्षऱ्या अथवा अंगठ्याचे ठसे घेणे.

(७) रोजंदारीवरील लाभार्थींना त्यांनी केलेल्या कामाचा मेहेनताना अदा करीत असताना ग्रामसभेसमोरच हजेरीपत्रकाचे वाचन करणे.

(८) रोजंदारीवरील प्रत्येक लाभार्थी व्यक्तीस देय असणारी मजुरीची रक्कम लेखी स्वरूपात अधिसूचित करणे.

(९) योजनेंतर्गत रोजंदारीवर येणाऱ्या लाभार्थींची यादी ग्रामसभेच्या मासिक अथवा प्रासंगिक बैठकीत जाहीरपणे वाचून दाखविणे. तसेच हजेरीपत्रकाचेही नियमित वाचन करणे.

लिखापढीच्या कार्यपद्धतीपेक्षा ही कार्यप्रणाली अधिक थेट, अधिक लोकसहभागात्मक तर ठरेलच परंतु, लाभार्थींच्या निश्चितीकरणापासून ते मजुरीच्या वाटपापर्यंत सारे व्यवहार हे ग्रामसभेच्या साक्षीनेच घडत असल्याने या सर्वच प्रक्रियेचे 'सोशल ऑडिट' ही आपसूकच शक्य होईल.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या एकंदरच कार्यवाहीमध्ये त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्थेतील जिल्हा परिषदेपासून ते ग्रामपंचायतीपर्यंत तीनही स्थानिक स्वराज्य संस्थांकडे कायद्याने केंद्रवर्ती भूमिका सोपविलेली आहे. ग्रामीण परिसराच्या विकासप्रक्रियेत पंचायत राज्य संस्थांचा मुख्य सहभाग असल्याने ते संयुक्तिकही आहे. यातून साहजिकच मग सवाल उभा राहतो तो हा की, या योजनेच्या अंमलबजावणीची ही जबाबदारी कार्यक्षमपणे पेलण्यास पंचायत राज्य संस्था आजमितीस कितपत सक्षम आहेत ? तसेच, समजा त्या आज तशा व तितपत सक्षम नसतील तर त्यांचे अनुरूप असे सबलीकरण कसे करता येईल, याही दुसऱ्या संलग्न मुद्याचा विचार करावा लागेल.

त्यातही पुन्हा बारकाईने पाहिले तर तुलनेने अधिक कळीची भूमिका बजावावी लागणार आहे ती ग्रामपंचायतींना. कारण, कायद्यान्वये ग्रामपंचायतींकडे सुपूर्त केलेली कामे अतिशय मूलभूत स्वरूपाची अशी आहेत. ग्रामपंचायतींकडून त्या कामांची तामिली कार्यक्षमतेने झाली नाही तर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कार्यवाहीच होऊ शकणार नाही. कायद्याने ग्रामपंचायतींकडे सोपविलेली कामे अशी आहेत:

(१) इच्छूक लाभार्थींची नोंदणी करणे.

(२) लाभार्थींचा लेखी अर्ज मिळाल्याची लेखी पोचपावती देणे.

(३) नोंदणीकृत लाभार्थीस 'जॉब कार्ड' अदा करणे.

(४) योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांची यादी तयार करणे.

(५) ग्रामसभेकडून कामांचे निश्चितीकरण करून घेणे.

(६) कामांचे प्रस्ताव छाननीसाठी पंचायत समितीकडे सादर करणे.

(७) ग्रामसभेने मंजूर केलेल्या कामांची कार्यवाही करणे.

(८) कामांच्या कार्यवाहीवर देखरेख ठेवणे.

(९) प्रवर्तित केलेल्या कामांचे वेळोवेळी 'सोशल ऑडिट' करणे.

कायद्यान्वये ग्रामपंचायतींकडे सोपविलेल्या कामांचे हे स्वरूप पाहिले की राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या गावपातळीवरील कार्यवाहीमध्ये ग्रामपंचायतींची भूमिका किती कळीची आहे, याची कल्पना येते. या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्याइतपत प्रशासकीय क्षमता ग्रामपंचायतींच्या ठायी आज आहे किंवा नाही, याची चाचपणी कसोशीने करणे अगत्याचे आहे. या सगळ्यात जो मोठ्या प्रमाणावरील कागदोपत्री व्यवहार आहे, कागदपत्रांची पूर्तता करण्याचे काम आहे, ते वेळच्यावेळी करण्यास आज ग्रामपंचायतींकडे सक्षम असे मनुष्यबळ आहे का, हे पाहणे गरजेचे आहे.

आजमितीस ग्रामपंचायतींचा प्रशासकीय कारभार, पंचायतींचे हिशेब, लिखापढी, 'रेकॉर्ड' व्यवस्थित ठेवणे, ग्रामपंचायतीचा पत्रव्यवहार ही सारी कामे ग्रामसेवक पार पाडतात. एका ग्रामपंचायतीमध्ये एक ग्रामसेवक, असे समीकरण व्यवहारात अभावानेच पाळले गेल्याचे अनुभवास येते. एका ग्रामसेवकाकडे प्रसंगी दोन वा तीन ग्रामपंचायतींची जबाबदारी असते. अशा परिस्थितीत, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संलग्न वाढीव लिखापढी पंचायत पातळीवर कोण करणार, हा प्रश्नच आहे. या कामासाठी वेगळा माणूस नेमण्याइतपत आर्थिक ताकद सगळ्याच ग्रामपंचायतींकडे आहे, अशी स्थिती नाही. मग ही अवघी लिखापढी कोण करणार ?

या प्रश्नाची व्याप्ती केवळ प्रशासकीय बाबींपुरतीच सीमित नाही. या योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांची यादी बनविणे, हे महत्त्वाचे काम पंचायतीकडेच आहे. कामांना मंजुरी द्यावयाची ती ग्रामसभेने. आता, ग्रामसभेच्या बैठका नियमित होतात का, हाही एक नाजूक मुद्दाच आहे ! ग्रामसभांचे आयोजन, ग्रामस्थांचा त्यांमधील सहभाग, बैठकांचे कामकाज याबाबतचे चित्र एकंदरच फारसे उत्साहवर्धक नाही. मग कामांचे निश्चितीकरण वेळेवर होणार का ? राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांची सांगड गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आखलेल्या योजनेशी

घातली जाणे अपेक्षित आहे. किती गावांमध्ये अशा विकास योजना आज तयार होतात ? ग्रामसभेने रीतसर मंजुरी दिलेल्या कामांचे वित्तीय तसेच तांत्रिक प्रस्ताव तयार करून ते छाननीसाठी पंचायत समितीकडे सादर करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. असे प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारी कौशल्ये व क्षमता आज ग्रामपंचायतींच्या ठायी आहेत का, याचाही विचार होणे निकडीचे आहे. या सगळ्या विवेचनाचा सूर केवळ नकारार्थीच आहे, असे मानण्याचे कारण नाही. मात्र, या सर्व बाबी ध्यानात घेतल्या जाऊन पंचायत राज्य संस्थांचे सबलीकरण होणे हे, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी अनिवार्यच ठरते.

हा सारा खटाटोप करण्याऐवजी पंचायत राज्य संस्थांना समांतर अशी लोकसहभागात्मक यंत्रणा गावपातळीवर उभी करून या यंत्रणेच्यामार्फत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची तामिली करण्यात यावी, असा पर्यायही काहींनी सुचवून पाहिला आहे. गावपातळीवर कार्यरत असणारे तरुणांचे गट, संस्था, गावातील महिला मंडळे, बचत गट यांसारख्या लोकसंस्थांचा सहभाग या योजनेसाठी सक्रिय करता येईल का, या पर्यायाचा विचार केला जावा, असे या संदर्भात सुचविले जाते. मात्र, हे व्यवहार्य वाटत नाही. याचे एक मुख्य कारण म्हणजे, पंचायत राज्य संस्थांच्या प्रचलित कार्यपद्धतीमध्ये आज काही त्रुटी असल्या तरी अखेर या स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनादत्त अधिष्ठान आहे. या संस्था कायद्यान्वये स्थानिक नागरिकांना जबाबदार आहेत. गावपातळीवरील अन्य संस्थांना अशा प्रकारचे घटनात्मक अधिष्ठान नाही. तसेच, विद्यमान यंत्रणेमध्ये आढळून येणारे दोष व त्रुटी नव्याने उभारलेल्या पर्यायी, समांतर व्यवस्थेमध्ये, आज नाही तर उद्या, प्रवेश करणारच नाहीत याची हमी काय ? तेव्हा सद्यःस्थितीत तरी पंचायत राज्य संस्थांचेच सबलीकरण घडवून आणण्यास अग्रक्रम देणे, सर्वार्थाने उचित ठरेल.

परंतु, स्थानिक लोकसमूहांचा सहभाग राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यवाहीमध्ये आवश्यक आहेच. किंबहुना, या योजनेंतर्गत गावपातळीवर जी कामे हाती घ्यावयाची त्या कामांची निवड, निश्चितीकरण, कार्यवाही, अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यानंतर त्या कामांवर देखरेख, अशा कामांचे 'सोशल ऑडिट', पूर्ण झालेल्या कामांचे-प्रकल्पांचे मूल्यमापन या साऱ्याच बाबी लोकसहभागात्मक कार्यप्रणालीद्वारे साकारणे अगत्याचे आहे. यांत स्थानिक लोकसमूह तसेच लोकसंस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. मात्र, या पद्धतीने 'सोशल ऑडिट' करण्याच्या क्षमता स्थानिक

लोकसमूहांच्या ठायी आहेत किंवा नाही, याचीही छाननी होणे अगत्याचे आहे. प्रसंगी, या कामासाठी अशा गटांचेही सबलीकरण हाती घ्यावे लागेल. देखरेख करणाऱ्या अशा यंत्रणांचे सबलीकरण जेवढे नेमके होईल तितके या कामांचे 'सोशल ऑडिट' अधिक काटेकोर व नियमितपणे होईल. यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमिततांना पायबंद बसण्याबरोबरच तिच्या तामिलीतील संभाव्य विलंबही टळण्यास हातभार लागेल. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रवर्तित करण्यात आलेल्या प्रकल्पांचे 'सोशल ऑडिट' लोकसहभागात्मक पद्धतीने शक्य व्हावे यासाठी अशा कामांचे 'रेकॉर्ड' ठेवण्याच्या प्रणालीही सोप्या, सुटसुटीत (पीपल/यूज़र फ्रेन्डली) असाव्यात याबाबत दक्षता घ्यावी लागेल. कामांसंदर्भातील नियम पुस्तिका, हाती घेण्यात आलेल्या कामांचे तांत्रिक तपशील, हिशेब यासारख्या नानाविध बाबींचे दस्तावेज हे किमान क्षमता असणाऱ्या कोणाही व्यक्तीस वाचता येतील, समजतील अशा प्रकारे तयार केले जाणे अगत्याचे ठरते.

या योजनेची अंमलबजावणी एखाद्या गावात होण्यापूर्वी त्या गावासंदर्भातील किमान पायाभूत माहितीचे पद्धतशीर संकलन होणे, हेदेखील एक अतिशय महत्त्वाचे काम आहे. ही सारी सांख्यिकी अद्यावत राखणे हे त्यापुढील काम. गावाची लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, रोजगार, गावातील प्रमुख आर्थिक घटक, कामगार संख्या, रोजगाराची गरज असणारे समाजघटक, गावाला भेडसावणाऱ्या अडचणी, स्थानिक समस्या, पायाभूत सुविधा यांसारख्या बाबींचा अंतर्भाव या 'डेटा बेस'मध्ये असावयास हवा. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची तामिली सुरू होण्यापूर्वी असा 'बेसलाइन डेटा' संकलित करून ठेवल्यास योजनेच्या मूल्यमापनादरम्यान, तिच्या परिणामकारकतेची शहानिशा करताना ही पायाभूत माहिती उपयुक्त ठरते. तसेच, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रवर्तित करण्यात आलेल्या उपक्रमांची प्रस्तुतता, गावाच्या समस्यांशी त्यांचा असणारा अनुबंध यांसारख्या मूलभूत बाबीही अशा पायाभूत अद्यावत माहितीच्या उपलब्धतेमुळे जोखून घेता येतात.

प्रत्यक्ष कामास प्रारंभ होण्यापूर्वी, योजनेच्या अंमलबजावणीबाबतची माहिती परिसरातील गरजूंपर्यंत पोहोचावी, यासाठीदेखील प्रभावी यंत्रणा कार्यरत असणे गरजेचे आहे. ग्रामसभेने शिफारस केलेल्या कामांना, त्यासंदर्भात सादर केलेल्या तांत्रिक तसेच वित्तीय प्रस्तावांना संबंधित यंत्रणेकडून विनाविलंब मंजुरी मिळणे या बाबीदेखील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यक्षम आणि परिणामकारक कार्यवाहीच्यादृष्टीने

अगत्याच्या आहेत. एकदा कामे सुरू झाल्यानंतर त्या कामांसाठी वेळेवर आणि पुरेसा निधीपुरवठा होणे, हेही योजनेच्या यशस्वितेचे एक महत्त्वाचे गमक ठरते. त्यातही पुन्हा संवेदनशील ठरतो तो रोजंदारीवरील व्यक्तींचा मेहेनताना अदा होण्याचा प्रश्न. महाराष्ट्राने राबविलेल्या रोजगार हमी योजनेचा या संदर्भातील दाखला उद्‌बोधक आहे. कोणत्याही रोजगार हमी योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या रोजंदारीच्या दराइतकाच, किंबहुना त्याहीपेक्षा कदाचित काकणभर अधिकच महत्त्वाचा मुद्दा ठरतो तो मजुरी अदा होण्याच्या वेळापत्रकाची शिस्त पाळण्याचा. ठरलेला मेहेनताना रोजगारावरील व्यक्तींना वेळेवर मिळतो अथवा नाही, या बाबीकडेही पुरेसे लक्ष पुरवावयास हवे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मूळ उद्दिष्टाशी संलग्न अशीच ही बाब आहे. ग्रामीण भागातील कुटुंबांना उपजीविकेच्या संधींबाबत सुरक्षा पुरविणे (लाइव्ह्‌लिहूड्‌ सिक्युरिटी) हे या योजनेचे आद्य ध्येय आहे. एका वित्तीय वर्षातील काही किमान दिवस किमान मजुरीदराने रोजगाराची हमी, हे या 'सिक्युरिटी'चे साररूप आहे. परंतु त्याच वेळी, केलेल्या कामाचा मेहेनताना हा वेळेवर मिळणे, हेदेखील त्याच 'सिक्युरिटी'चे दुसरे अभिन्न परिमाण आहे.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीद्वारे देशाच्या ग्रामीण भागात जी विविध स्वरूपाची सार्वजनिक मालमत्ता, ज्या विविध पायाभूत सेवा, साधनसुविधा निर्माण होतील त्यांची उत्पादकता, त्या उत्पादकतेचे संगोपन-संवर्धन, त्या सुविधांची व मालमत्तेची वेळेवर व पुरेशी देखभाल-डागडुजी हा या योजनेचा एक तितकाच महत्त्वाचा आणि संवेदनशील पैलू. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ज्या सार्वजनिक सुविधा तयार होतील त्या उत्पादक स्वरूपाच्या असाव्यात अशी अपेक्षा आहे. केवळ इतकेच नव्हे तर, आजमितीस ग्रामीण भागांत विद्यमान असणाऱ्या सार्वजनिक तसेच खासगी साधनसुविधांची, गुंतवणूकीची उत्पादकता वाढण्यास या योजनेच्याद्वारे निर्माण होणाऱ्या मालमत्तेने हातभार लावावा, अशीही अपेक्षा आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांच्या सूचीतील जलसंधारण, वनीकरण, सिंचन, जमीन सुधारणा, बारमाही वाहतुकीच्या सुविधांची निर्मिती यांसारख्या कामांचे महत्त्व आहे ते नेमके याचसाठी.

अशा सार्वजनिक मालमत्तेची निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांची पूर्तता वेळेवर होणे ही यातील खरी पूर्वअट आहे. प्रकल्पाची पूर्तताच झाली नाही तर अशा अर्धवट उपक्रमांवरील खर्च अंतिमतः अनुत्पादकच ठरतो. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचा या संदर्भातील अनुभव पुरेसा बोलका आहे. मात्र, पूर्तता झालेल्या प्रकल्पांची वेळेवर

देखभाल, डागडुजी होणे ही त्या सुविधांचे, मालमत्तांचे आयुष्य वाढविण्याबरोबरच त्यांची उत्पादकता शाबूत राखण्याच्यादृष्टीने अत्याधिक आवश्यक अशी बाब आहे. पुरेशा देखभालीअभावी एखाद्या सार्वजनिक सुविधेचे वा मालमत्तेचे आयुष्य घटले तर तो त्या साधनाच्या निर्मितीवरील गुंतवणूकीचा एक प्रकारे अपव्ययच ठरतो. डागडुजीअभावी एखादी सुविधा ज्या वेळी निरूपयोगी बनून अनुत्पादक ठरते, त्या वेळी अशा मालमत्तेकडून अपेक्षित त्या सेवा व लाभ अपेक्षित कालावधीसाठी तर मिळत नाहीतच, उलट त्यांच्या निर्मितीखातर व्यस्त झालेली भांडवली गुंतवणूकही अंतिमतः वायाच जाते. आवश्यक त्या निधीची वानवा, हे देखभालीच्या अशा अभावाचे बहुशः कारण असते.

नव्याने प्रवर्तित करण्यात आलेल्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत निर्माण होणाऱ्या सार्वजनिक मालमत्तेची उत्पादकता पुरेशा व वेळोवेळी आवश्यक असणाऱ्या देखभाल-दुरुस्तीअभावी घटू नये यासाठी वेगळ्या निधीची काही तरी तरतूद करण्यास प्राधान्य द्यावयास हवे. बरेचदा असेही होते की, एखाद्या योजनेंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधेचे वा मालमत्तेचे हस्तांतरण (योजनेच्या पूर्ततेनंतर) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे केले जाते. त्या सुविधेची देखभाल व डागडुजी ही मग त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी बनते. मात्र, अनेक ठिकाणी असे आढळून येते की अशा हस्तांतरित मालमत्तेची जपणूक करण्याइतपत वित्तीय बळ त्या संस्थेच्या ठायी नसतेच. परिणामी, वेळोवेळी आवश्यक असणाऱ्या देखभाल-डागडुजीच्याअभावी अशी सुविधा वा मालमत्ता कालांतराने वापरातून हद्दपार होते आणि तिच्या निर्मितीवरील भांडवली गुंतवणूक पाण्यात जाते. या अनुभवामुळे, अनेक ठिकाणी आता असेही आढळून येते की एखाद्या विकास योजनेंतर्गत तयार करण्यात आलेली सार्वजनिक सुविधा अथवा मालमत्ता हस्तांतरणाद्वारे आपल्या ताब्यात घेण्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था या तयारच होत नाहीत. परिणामी, अशा मालमत्तांच्या देखभालीस कोणतीच यंत्रणा वा संस्था ही जबाबदार राहात नाही आणि शेवटी डागडुजीअभावी अशा सुविधांचे सांगाडे हे अनुत्पादक अवस्थेत पडून राहतात. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत निर्माण होणाऱ्या सार्वजनिक मालमत्तेची तरी अशी हेळसांड पुढे होऊ नये, याची काळजी घेतली जाणे अपेक्षित आहे.

या योजनेंतर्गत निर्माण होणाऱ्या सार्वजनिक मालमत्तांना सामाजिक समता आणि सार्वजनिक कल्याणाचाही एक पदर आहे. या योजनेद्वारे निर्माण होणाऱ्या

सुविधांचा लाभ समाजातील सर्व घटकांना समानतेने मिळतो आहे ना यावरही कटाक्ष राखणे अगत्याचे आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागांतील उत्पन्न वा खासगी मालमत्तेच्या विद्यमान धारणात तसेच वाटपात आज कदाचित काहीच बदल घडून येणार नाही. परंतु, समाजातील विविध लोकसमूहांच्या व्यक्तिगत तसेच सामूहिक उत्पादन साधनांच्या तसेच जमिनीसारख्या मालमत्तेच्या उत्पादकतेत अनुकूल, सकारात्मक बदल खचितच घडून येऊ शकतो. ग्रामीण भागांतील दळणवळणाचे रस्ते, सिंचनाच्या सोयी-सुविधा यांचे भौगोलिक स्थानांकन तसेच या सुविधांपासून मिळणाऱ्या लाभांचे समाजातील विविध घटकांना समन्यायी वाटप याबाबत मात्र सर्वच संबंधितांना जागरूक राहावे लागेल.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसारख्या एका अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेची परिणामकारकता ज्या विविध बाबींवर अवलंबून आहे अशा बाबींचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न येथवर केला. या योजनेच्या काही पैलूंचा देशाच्या एकंदर विकास प्रक्रियेवर काय व कोणता परिणाम संभवतो, हा अभ्यासाचा आणखी एक प्रांत.

*(संदर्भ: ३० आणि ३१ डिसेंबर २००५ रोजी भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादादरम्यान झालेले मंथन).*

## डॉ. सत्यरंजन साठे यांचे निधन

विख्यात विधिज्ञ प्रा. डॉ. सत्यरंजन साठे यांचे १० मार्च २००६ रोजी निधन झाले. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीशी प्रा. साठे यांचा १९९० सालापासून अखेरपर्यंत मानद सदस्य या नात्याने अनुबंध होता. संस्थेच्या उपक्रमांमध्ये प्रा. साठे यांचा सदैव सक्रिय सहभाग राहिला. संस्थेच्या नियामक मंडळाच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकांना नियमित उपस्थित राहण्याबद्दल प्रा. साठे यांनी अखेरपर्यंत कटाक्ष पाळला. कायद्याचे एक व्यासंगी प्राध्यापक असा लौकिक असणाऱ्या साठे यांचा विविध सामाजिक संस्था तसेच उपक्रमांशीही जवळचा संबंध होता. 'ज्यूडिशियल ॲक्टिव्हिजम इन इंडिया' या विषयावर प्रा. साठे यांनी, 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी', या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या संशोधनपर नियतकालिकात अतिशय व्यासंगपूर्ण असे चार प्रदीर्घ संशोधनात्मक लेख लिहिले होते. या चार लेखांचे एकत्रित संकलन पुढे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने पुस्तकरूपाने प्रसिद्धही केले. प्रा. साठे यांचा हा ग्रंथ विद्वत्मान्य ठरला आहे.

विज्ञान-संशोधन

# ई - नाक !

'नावात काय आहे ?' या धर्तीवर 'नाकात काय आहे ?' असा प्रश्न विचारण्याची हिंमत कधी कोणी केली आहे काय ? पण हाच प्रश्न व्यंगचित्रकारांना विचारला तर त्यांची कळी कशी खुलेल नाही ? प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांनी काढलेली राजकीय नेत्यांची व्यंगचित्रे आठवा. नाही तर आपल्या लाडक्या ऐश्वर्याचे वा करीनाचे चाफेकळी नाक आठवा. आपल्या मराठी भाषाविश्वात तर नाकाची महती फार मोठी आहे. नाक कापणे, नाकावर आपटणे, नाक घासणे, नाकदुऱ्या काढणे, (नसत्या भानगडीत) नाक खुपसणे, नाकापेक्षा मोती जड.... असे अनेक वाक्प्रचार नाकावरून रूढ झाले आहेत. असो, पण नाकात काय आहे ? हा प्रश्न शास्त्रज्ञांना विचारला तर ! कारण, गेली अनेक वर्षे ते, या 'नाका'त 'नाक खूपसून बसले' आहेत.

माणसाचे नाक अनेकविध प्रकारचे गंध कसे घेऊ शकते हे कुतूहल शास्त्रज्ञांच्या मनी दाटले आणि त्याचा त्यांनी कसोशीने अभ्यासही केला. मानवी शरीरात - मेंदूत - वास घेण्यासाठी ऑलफॅक्टरी सिस्टिम अशी विशिष्ट यंत्रणा असते. मेंदूचे कार्य हे अब्जावधी मज्जापेशींच्या जाळ्यातून -संदेशांच्या (हे विद्युत-रासायनिक संदेश असतात) देवाणघेवाणीतून घडून येते. या देवाणघेवाणीतूनच ऑलफॅक्टरी यंत्रणा काम करते आणि त्यासाठी हजारो मज्जापेशी या ऑलफॅक्टरी यंत्रणेत कार्यरत असतात. चेहरे ओळखण्यासाठी आपण काही विशिष्ट बाबी लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करतो त्याचप्रमाणे या मज्जापेशी काही विशिष्ट संदेश लक्षात ठेवतात. त्यामुळे आपल्याला येणारे विविध गंध हे या यंत्रणेने लक्षात ठेवलेले असतात. या यंत्रणेचा एक भाग म्हणजे नाक होय. या मानवी नाकापासून प्रेरणा घेऊन शास्त्रज्ञांनी इलेक्ट्रॉनिक नाक (क्यौं की.....इलेक्ट्रॉनिक्स का जमाना है !) तयार केले आहे.

काही उद्योगांमध्ये वास घेण्यासाठी परंपरागत पद्धतीचे केमिकल सेन्सर्स सध्या उपयोगात आहेत. पण एका रासायनिक घटकाचा वास घेण्यासाठी एक सेन्सर तयार करणे हे खर्चिक असते, आणि त्याचा उपयोगही मर्यादितच असतो. मात्र हे नवे इलेक्ट्रॉनिक नाक अन्नपदार्थ खराब झाले आहेत किंवा कसे येथपासून ते सार्वजनिक

ठिकाणी असणारी स्फोटके अशा सर्व बाबींचा वास घेऊ शकते. इलेक्ट्रॉनिक नाक हे पॉलिमर फिल्मच्या विशिष्ट रचनेतून तयार करण्यात आले आहे. यासाठी वापरण्यात आलेली प्रत्येक पॉलिमर फिल्म थोड्याफार फरकाने वेगळी असते. रसायनांच्या संपर्कात आल्यानंतर प्रत्येक फिल्मच्या इलेक्ट्रिकल कंडक्टिव्हिटीवर (संवाहनशक्ती) परिणाम होतो. जेव्हा एखाद्या विशिष्ट गंधाला ही फिल्म सामोरी जाते, तेव्हा विशिष्ट फिल्म या विशिष्ट पद्धतीचाच प्रतिसाद देतात.

विवेक सुब्रमणियन (कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले) यांनी आणखी एका प्रकारे कार्य करणारे इलेक्ट्रॉनिक नाक तयार केले आहे. त्यांच्या ई - नाकात पॉलिमर फिल्मऐवजी ट्रान्झिस्टरचा उपयोग करण्यात आला आहे. हे ट्रान्झिस्टर सेमिकंडक्टर असलेल्या काही जैविक पदार्थांपासून तयार करण्यात आले आहेत. एखाद्या पदार्थांचा वास घेण्यासाठी सेन्सरपेक्षा ट्रान्झिस्टर अधिक चांगले ठरू शकतात. कारण विद्युतभारातील (चार्ज) आणि बंधांमधील (बॉन्ड स्ट्रक्चर) सूक्ष्म फरकाची नोंद त्यात घेतली जाते. वेगवेगळ्या जैविक पदार्थांपासून तयार करण्यात आलेले ट्रान्झिस्टर हे वेगवेगळ्या संयुगांना (कम्पाउंड्स्) भिन्न प्रतिसाद देतात. उदाहरणार्थ, पाच प्रकारच्या जैविक ट्रान्झिस्टरद्वारे चांगली वाइन कोणती व खराब झालेली वाइन कोणती, हे समजून येते. कार्य करण्याच्या पद्धतीत हे इलेक्ट्रॉनिक नाक भिन्न आहे त्याप्रमाणे ते तयार करण्याच्या पद्धतीतही वेगळे आहे. त्यामुळे ई - नाक तयार करण्याच्या खर्चात मोठी बचत होते. परिणामी त्यांच्या सध्याच्या किंमतीपेक्षा (१०० डॉलर) फार कमी दरात (अगदी १ डॉलर एवढे कमी) ते तयार करता येऊ शकतात. डॉ. सुब्रमणियम यांचा असा विश्वास आहे की भावी काळात हे ई - नाक इतके कमी किंमतीत तयार करता येईल की ते खाद्यपदार्थ वा अन्नधान्य असणाऱ्या डब्यांमध्ये किंवा औषधांच्या खोक्यांमध्येही वापरता येईल. म्हणजे हे पदार्थ खराब होण्याच्या मार्गावर आहेत वा झाले आहेत, हे समजून येईल.

समाजात होत असलेल्या बदलांमुळे बंद डब्यांमधील खाद्यपदार्थांची (आणि आजारांचीही ?) मागणी वाढते आहे. त्यामुळे भविष्यकाळात स्वयंपाकघरात अन्न शिजविण्याऐवजी पॅकबंद डबे उघडण्याचीच संस्कृती रूढावली तर हेच ई - नाक सर्वसामान्यांच्या मदतीला धावून येईल, अशी आशा करायला हरकत नाही.

*(संदर्भ - इकॉनॉमिस्ट ११ मार्च २००६)*


परिचय

# ‘हार्ड पॉवर’ आणि ‘सॉफ्ट पॉवर’

घरी काय अथवा दारी काय, ‘बळी तो कान पिळी’ हाच न्याय व्यवहारात आढळून येतो. दुर्बलांच्या शांतिपाठाला आणि क्षमाशीलतेला जग भीक घालत नाही. म्हणूनच जगात वास्तवात सत्ता चालते ती दंडशक्तीची. इंग्रजी भाषेत या शक्तीला संज्ञा आहे ‘हार्ड पॉवर’. देशाचे लष्करी सामर्थ्य, आर्थिक ताकद, शस्त्रसज्जता, विशाल लोकसंख्या ही झाली या ‘हार्ड पॉवर’ची काही हुकूमी उदाहरणे. बरे अशी ताकद वा शक्ती तरी का असावयास हवी? याचे उत्तर सोपे आहे. दुसऱ्याला आपल्या अंकित करून घेऊन त्याला आपल्या तालावर नाचण्यास भाग पाडण्यासाठी माणसाजवळ ताकद हवी. आंतरराष्ट्रीय राजकारणात देशादेशांमधील संबंधांतही हेच तत्त्व लागू पडते. मात्र, शीतयुद्धाचा अंत घडून आल्यानंतर आंतरराष्ट्रीय सत्तापटलावरील चढाया-प्रतिचढायांमधील आयुधे व व्यूहरचना पालटली आहे. आजच्या युद्धात उपयोगी ठरते ती ‘सॉफ्ट पॉवर’. आंतरराष्ट्रीय राजकारणात अलीकडे ‘सॉफ्ट पॉवर’ हा परवलीचा शब्द बनला आहे. जगविख्यात हॉर्वर्ड विद्यापीठातील जॉन एफ. केनेडी प्रशासन अध्यापन केंद्राचे माजी अधिष्ठता प्राध्यापक जोसेफ न्ये हे ‘सॉफ्ट पॉवर’ या संकल्पनेचे जन्मदाते. लष्करी सिद्धता, शस्त्रसंभार यांऐवजी प्राचीन व भव्य परंपरेचा वारसा, नैतिक मूल्यांचा ठेवा, समृद्ध संस्कृतीचा अक्षुण्ण वाहता प्रवाह, कलापरंपरा यांसारख्या ‘सॉफ्ट’ आयुधांनी प्रतिस्पर्धी देशावर गारूड करणे, त्याला आपल्या गोटात सामील करून घेणे हा झाला ‘सॉफ्ट पॉवर’चा प्रयोग. जागतिकीकरणाच्या प्रवाहाने घुसळून निघालेल्या आजच्या जगात चीन आणि भारत हे आशिया खंडातील दोन प्राचीन देश या ‘सॉफ्ट पॉवर’च्या भरवशावरच आपला ठसा उमटविण्यास सिद्ध होत आहेत, असे आंतरराष्ट्रीय राजकारणातील निरीक्षकांचे प्रतिपादन आहे. भारताची बहुसांस्कृतिकता, अध्यात्माचा ठेवा, संतपरंपरा, आयुर्वेद, अष्टांगयोग, अन्य संचित ज्ञान, सण-उत्सवांचे समाजजीवनातील स्थान, कुटुंबव्यवस्था यांबद्दलचे आकर्षण पाश्चात्य देशांमध्ये वाढते आहे. याच्या जोडीलाच आर्थिक आघाडीवरही भारताची कामगिरी आकर्षक असल्याने भारताची एक आगळी ओळख जागतिक समुदायासमोर नव्याने उभरते आहे. हाच तो ‘सॉफ्ट पॉवर’चा आविष्कार !

# छोट्याशा देशाचे मोठे उदाहरण

अविकसित समजल्या जाणाऱ्या आफ्रिका खंडाच्या पश्चिमेला असणारा आणि जगाच्या नकाशात अतिशय छोटी जागा व्यापणार एक देश आहे बेनिन. लष्करी हुकूमशाही आणि मार्क्सवादाला तिलांजली देऊन या देशाने १९९०मध्ये लोकशाही स्वीकारली. अलिकडेच (५मार्च २००६) तेथे अध्यक्षीय पदासाठी झालेली चौथी सार्वत्रिक निवडणूक हा लोकशाहीसाठी एक मोठा टप्पा म्हणता येईल. कारण तेथे घटनेनुसार अध्यक्षपदासाठी वयोमर्यादा (७० वर्षे) ठेवण्यात आली असून, ती पार केल्याने सध्याचे अध्यक्ष मॅथिउ केरेको आणि त्यांचे कट्टर प्रतिस्पर्धी माजी अध्यक्ष निसेफो सोग्लो (१९९१-९६) या दोघांनीही यंदाची निवडणूक लढविलेली नाही. जास्त काळ सत्तेवर राहण्यासाठी आफ्रिकेत कायदा धाब्यावर बसविण्याचे प्रकार सर्रास होत असतानाही या दोघांनीही घटनेला मान दिला आहे, ही सर्वत्र कौतुकाची बाब मानली




जात आहे. बेनिन हा जगातील सर्वात गरीब देशांमधील एक देश असून त्याची लोकसंख्या आहे जेमतेम आठ कोटी. तरीही या देशाने लोकशाहीचे एक उत्तम उदाहरण घालून दिले आहे. पूर्वी आफ्रिकेत फ्रेंच नागरिकांच्या वसाहती मोठ्या प्रमाणावर होत्या. या देशांना अधिक आर्थिक मदत देताना, त्याच्या मोबदल्यात तेथे लोकशाही आणावी असा दबाव फ्रान्सने त्यांच्यावर आणला. ही आर्थिक मदत मिळविण्यासाठी बहुपक्षीय लोकशाही मान्य करणाऱ्यांमधील एक देश आहे बेनिन. पण हुकूमशहा असलेल्या मॅथिउ केरेको यांनी केवळ तत्वतः ही लोकशाही

मान्य केली असे नव्हे तर, ती स्वतःच्या कृतीतून व्यवहारातही आणली. लोकशाही स्वीकारल्यानंतर १९९१मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. खुल्या मनाने त्यांनी ही हार मान्य केली आणि ते सत्तेवरून पायउतार झाले. हुकूमशाही राजवटीत उच्चपदस्थ असणाऱ्या व्यक्तीने निवडणूक लढविण्याचा इतिहास आफ्रिकेतील देशांमध्ये बेनिनने घडविला. यानंतर तेथील नागरिकांच्या मनात लोकशाही घट्ट रुजली आहे. जगभरातीलच गरीब देशांना भेडसावणारे अनेकानेक गंभीर प्रश्न आणि लष्करी हुकूमशाही यामुळे आपल्या देशाचा इतिहास फार वाईट आहे हे जाणून, आता निदान आपला भविष्यकाळ तरी चांगला असावा, यासाठी तेथील नागरिक लोकशाही मूल्यांचा अंगीकार करीत आहेत.

असे असले तरी तेथील निवडणुका फार सुरळितपणे पार पडल्या असे नाही. निवडणूक स्थळी निवडणुकीची साधनसामग्री न पोचणे, मतदान केंद्रे वेळेवर न सुरू होणे, निवडणूक अधिकारी जागेवर उपस्थित नसणे असे अनेक प्रकार तेथेही झाले. तेथील निवडणूक आयोग स्वायत्त आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत मात्र अध्यक्ष केरेको यांनी आयोगावर ठपका ठेवला आहे. पण एक लक्षणीय बाब अशी की मतदान करण्यासाठी नागरिकांमध्ये मोठा उत्साह होता. दरम्यान, इतर काही उमेदवारांनी निवडणूक आयोगाकडे निवडणूक प्रक्रियेबाबत तक्रारी दाखल केल्या आहेत. या निवडणूकीचा निकाल अद्याप लागलेला नाही. मात्र, बँकिंग क्षेत्राशी संबंधित यायि बोनी हे पहिल्या फेरीत आघाडीवर असल्याचे समजते. दुसऱ्या फेरीत त्यांची गाठ केरेको यांच्या कट्टर प्रतिस्पर्ध्याबरोबर - माजी पंतप्रधानांबरोबर - पडणार आहे. कदाचित तेथे निवडणुकीची दुसरी फेरी होणारही नाही. कारण, केरेको यांनी या संदर्भात अमेरिकेत २०००साली झालेल्या निवडणुकीचे उदाहरण दिले असून तेथे पहिल्या फेरीची मतमोजणी होण्यासाठीच काही महिन्यांचा कालावधी गेला होता असे संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले आहे. तर, पहिली फेरी अवैध ठरल्यास केरेको यांना आपला राजकीय वारस निवडण्यासाठी वेळ हवा आहे म्हणून ते असे विधान करून वेळकाढूपणा करीत असल्याचे मत केरेको यांच्या टीकाकारांनी व्यक्त केले आहे.

असे असले तरी केरेको यांचा पूर्वेतिहास पाहता ते स्वतःहून पद सोडतील अशी आशा करायला हरकत नाही. बेनिनच्या शांतताप्रिय नागरिकांनी त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून त्यांना तो पाळण्यासही भाग पाडले पाहिजे. असे झाले तर एका माजी लष्करप्रमुखाने घालून दिलेला तो एक उत्तम पायंडा ठरेल. ✿✿

# न वाचणाऱ्यांचा देश!

ब्राझीलमधील अनेक नागरिकांना वाचता येत नाही आणि अनेकांना वाचण्याची इच्छाही नाही. ब्राझील हा न वाचणाऱ्यांचा देश आहे आणि तेथे १५ वर्षांवरील एक चतुर्थांश नागरिक हे 'अशिक्षित' या गटात मोडतात. दर तीन प्रौढ शिक्षितांपैकी फक्त एक जण पुस्तके वाचतो. तेथील सर्वसाधारण नागरिक दर वर्षाकाठी अभ्यासक्रमाशी संबंध नसणारी पुरती दोन पुस्तकेही वाचत नाहीत. वाचण्याच्या सवयींबाबत अलीकडेच ३० राष्ट्रांचे सर्वेक्षण करण्यात आले; त्या वेळी ही वस्तुस्थिती पुढे आली. या तीस देशांमध्ये ब्राझील २७व्या क्रमांकावर आहे. या देशातील नागरिक दर आठवड्यामागे फक्त ५.२ तास वाचण्यासाठी खर्च करतात. ब्राझीलचा शेजारी असलेला अर्जेन्टिना हा देश वाचण्याच्या या यादीत १८व्या क्रमांकावर आहे. हे चित्र आता बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे; कारण, ज्ञानाच्या या युगात आपल्या देशातील न वाचण्याची ही सवय बदलविण्याचा प्रयत्न सरकार, व्यापारी संस्था आणि स्वयंसेवी संस्था या तिघांनी एकत्रितरीत्या करण्याचे ठरविले आहे. नागरिकांनी पुस्तके वाचावीत यासाठी एक राष्ट्रीय योजना आखण्यात आली असून त्याची अंमलबजावणी १३ मार्च २००६ पासून चालूही झाली आहे. ग्रंथालयांना/ प्रकाशकांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे काम या योजनेंतर्गत हाती घेण्यात आले आहे. 'ब्राझील रीडर इन्स्टिट्यूट'ने नागरिकांपर्यंत पुस्तके पोचविण्यासाठी ग्रंथालयांच्या मदतीने एक उपक्रम आखला आहे. याशिवाय टी.व्ही.वरील लोकप्रिय मालिकांमधील पात्रे आता वाचन करताना दाखविण्यात येत आहेत. वाचनाची आवड निर्माण करण्यात एक अडचण अशी आहे की तेथे पुस्तके मात्र जरा महागच आहेत. पण हे एक छोटे कारण झाले. वाचनाची सवय न लागण्याचे मुख्य कारण, ब्राझीलने अनेक शतके गुलामगिरी सोसल्याने नेत्यांचे व नागरिकांचे शिक्षणाकडे झालेले दुर्लक्ष, हे होय. त्यातच १९३०च्या दशकात तेथे रेडिओ आला. त्यानंतर टी.व्ही.चे लोण घरोघरी पोहचले. त्यामुळे वाचनाची गोडी लागण्याआधीच तेथील नागरिकांच्या मनाचा ठाव इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी घेतला. पुस्तकांची बाजारपेठ निर्माण होण्याची शक्यता आता वाढलेली असली तरी, वाचनाची आवड निर्माण करणे हे सोपे काम नाही, असेही प्रत्ययास येत आहे. 'वाचाल तर वाचाल' हे तत्त्व नागरिकांना पटण्यासाठी किती काळ जावा लागेल याचा विचार संबंधित करीत आहेत. *(संदर्भ - इकॉनॉमिस्ट -१८ मार्च २००६)* ✿✿

## ..... गावाची पवित्र घडवावी मूर्ती

*वाचवूनि ग्रामसंपत्ती/ गावाची पवित्र घडवावी मूर्ती/*
*मग न जाताहि क्षेत्री, तीर्थी/ पुण्य लाभे ग्रामद्वारे// २४.६१*
*सप्ताह, एक्के, यज्ञ, उत्सव/ यासाठी वर्गणी होते ती सर्व/*
*काही वर्षे सुधारावया गाव/ याच कामी लावावी// २४.६२*
*जयंती असो वा पुण्यतिथि/ सप्ताह असो वा हवने पंगती/*
*पाहावी गावाची, राष्ट्राची स्थिती/तैसेचि करावे पुण्यकर्म// २४.६३*
*सर्व पंथीयांनी मिळावे/ सर्वांच्या हिताचे कार्य उभारावे/*
*हेकटपणे भरी न भरावे/ भलतियाचि// २४.६४*
*त्यासाठी करावी यात्रा-कमेटी/ यात्रा- मेळा-उत्सव-पर्वणी हाटी/*
*करावया सुधारणा उठाउठी/ राष्ट्रीयतेच्या // २४.६८*
*ग्रामोन्नतीची आयोजने करावी/ शक्ति- बुद्धीने राष्ट्रीयता भरावी/*
*आपुल्या गावाची कीर्ति जावी/ दिगंतरी तीर्थाऐसी// २४.६९*


रब्बीचा मोसम संपून पिकांची काढणी-मळणी उलगडली की हंगाम सुरू होतो तो गावोगावच्या जत्रा-उत्सव-उरुसांचा. या अशा वार्षिक जत्रा आणि उत्सव हे गावगाड्याचे एक पूर्वापार महत्त्वाचे अंग. नोकरीधंद्यानिमित्ताने शहरांच्या मार्गाला लागलेले चाकरमानेही या वार्षिक आनंदोत्सवासाठी आवर्जून गावाकडे परततात. गावकऱ्यांच्या बरोबरीनेच उत्सवाची गाववर्गणीही खुशीने देतात. गावगाड्याच्या अन्य कामांत आपल्याला एरवी भाग घेता येत नाही; मग लोकवर्गणीच्या रूपाने का होईना परंतु गावाच्या उत्सवकार्यात आपला सहभाग असावा, ही भावना यामागे बलवत्तर असते. ही सारी लोकवर्गणी, बव्हंशी, जत्रा-उरुसाच्या चार दिवसांदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या करमणुकीच्या कार्यक्रमांवरच खर्च होते. दोन-चार दिवस मजेत जातात. जत्रा संपते. पाव्हणे-रावळे आपापल्या गावी निघून जातात. गावकरी आणि गावाच्या नित्याच्या समस्या मात्र ठायीच्या ठायीच राहतात. ही परिस्थिती पालटावी

आणि या लोकवर्गणीचा विनियोग गावातील समस्यांच्या निराकरणासाठी अधिक डोळसपणे केला जावा, अशी तुकडोजींची तळमळ आहे. जत्रेची वर्गणी देताना हात आखडता न घेणारे गावकरी ग्रामपंचायतीने आकारलेले कर तितक्याच उत्साहाने भरतात का? ग्रामपंचायतींचे हिशेब या वास्तवाची साक्ष देतील. मग काय होते ? ... उदाहरणार्थ, पाणीपट्टी थकली की पाणीपुरवठ्याच्या, गावात उपलब्ध असलेल्या सुविधेची देखभालदेखील दुरापास्त होते; मग, पिण्याच्या पाण्याची हंगामी वा नित्याची टंचाई कायमची निपटून काढण्यासाठी भांडवली गुंतवणूक करणे तर दूरच. अगदी, धरणाच्या पाणीसाठ्याच्या कडेवर वसलेल्या गावांमध्येही मार्च महिना ओलांडला की पाण्यासाठी धावाधाव सुरू होते. गावची जत्रा दणक्यात साजरी होते आणि लगोलगच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी गावात टँकरच्या फेऱ्या सुरू होतात. कारण या साऱ्या जत्रा व उत्सव उन्हाळ्याच्या तोंडावरच तर साजरे होतात. हे झाले केवळ एक उदाहरण. महाराष्ट्रात आजमितीस अशी अनेक गावे आढळतील की जिथे गाववासियांच्या दैनंदिन जगण्याशी संबंधित अशी काही ना काही समस्या आहेच. मग, जत्रा-उत्सवाच्या वर्गणीच्या रूपाने प्रसंगोपात्त गावात जमा होणारी लोकवर्गणी ही, गावाच्या पाचवीला पुजलेल्या समस्यांच्या कायमस्वरूपी सोडवणूकीसाठीच खर्ची का पडू नये? यासाठीच, गावातील 'यात्रा कमेटी' सुजाण असावी, असे तुकडोजी सुचवितात. गावाच्या उन्नतीसाठी सुयोग्य नियोजन करण्याचे काम या समितीने डोळ्यासमोर ठेवावे, असे ते सांगतात. गावातील प्रचलित परिस्थिती पाहून त्यानुसार गावकऱ्यांच्या गरजांचा प्राधान्यक्रम गावकऱ्यांच्या सहमतीने या समितीने ठरवावा. त्यानुसार मग, यात्रा, सप्ताह, मेळे, उत्सव यांसारख्या सार्वजनिक उपक्रमांसाठी वर्गणीच्या रूपाने जमा होणारी पै न् पै त्याच गरजांची पूर्तता करण्यासाठी वेचली जावी, असा तुकडोजींचा सांगावा आहे. ग्रामसंपत्तीचा हा असा विनियोग, त्याद्वारे ग्रामरूपी मूर्तीची जडणघडण हेच मोठे पुण्यकर्म आहे, याबाबत तुकडोजी निःशंक आहेत. गणेशोत्सवासारख्या उपक्रमाच्यानिमित्ताने जमा होणाऱ्या लोकवर्गणीतून उत्पादक स्वरूपाच्या, दीर्घकालिक उपयुक्ततेच्या कल्याणकारी योजनांची कार्यवाही केली जावी, लोकसहभागाद्वारे निर्माण होणाऱ्या या धनराशीचा विनियोग केवळ त्या दहा दिवसांदरम्यानच्या दिखाऊ झगमगाटासाठीच केला जाऊ नये, असा विचार अगदी अलिकडे हळूहळू मांडला जात आहे. परंतु, नेमका तसाच विचार तब्बल ५०-५१ वर्षांपूर्वी आग्रहाने समाजमानसासमोर मांडण्यात आढळून येते ती तुकडोजींची द्रष्टी समाजमनस्कता. ✿✿

# आपली स्वप्नं पूर्ण करा !

- गृह कर्ज
- आधार स्कीम
- ग्राहकोपयोगी कर्ज
- किसान क्रेडिट कार्ड
- शैक्षणिक कर्ज
- रिकरिंग डिपॉझिट स्कीम

अवघ्या कुटुंबाची....
अवघ्या समाजाची
बांधिलकी जपणारी...
महाबँक



New Horizon '04

**बँक ऑफ महाराष्ट्र**

'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे-411 005.
www.maharashtrabank.com


## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१५ ऑक्टोबर २००४ पासून )**

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त १०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त १८० / - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट** |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) अर्थबोधपत्रिकेचा मेंदूसंशोधन विशेषांक (फेब्रुवारी - मार्च २००५) - (किंमत चाळीस रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

Twenty-first Century India : Population, Economy, Human Development and the Environment; Edited by -Tim Dyson, Robert Cassen and Leela Visaria; Published by -Oxford University Press; 2004, pp. 414; Price Rs. 685/-

भारतीय लोकसंख्येने एक अब्जाचा टप्पा केव्हाच ओलांडला आहे. २०२५ साली भारताची लोकसंख्या १ अब्ज ४० कोटी एवढी असेल, तर २०५० मध्ये १ अब्ज ५० कोटी. एवढ्या मोठ्या आणि वेगाने सतत वाढणाऱ्या लोकसंख्येचा देशाच्या एकूणच विकासावर निश्चितच परिणाम होणार. आतापर्यंत झालेल्या अशा परिणामांची दखल अर्थशास्त्रीय वाङ्‌मयाने घेतलेली आहे. याचा अर्थ, लोकसंख्या व विकास यांच्यातील सहसंबंध उलगडून दाखविणारे हे काही पहिलेच पुस्तक नाही. पण तरीही त्याचे एक वेगळेपण आहे आणि ते म्हणजे या पुस्तकात हा सहसंबंध एकात्मिक स्वरूपात मांडला आहे. त्याशिवाय मृत्यूप्रमाणातील बदलते प्रवाह, सर्वसाधारण आरोग्य तसेच जननक्षमतेमधील स्थित्यंतर, स्थलांतरण, शहरीकरण, साक्षरता आणि शिक्षण, रोजगार, अन्नधान्याची मागणी व पुरवठा, पाणी, पर्यावरण - अशा, विकासाशी संबंधित असणाऱ्या कितीतरी घटकांचा ऊहापोह त्यात आहे. या वाढत जाणाऱ्या लोकसंख्येचा एकूणच प्रभाव भारताच्या भवितव्यावर कसा पडणार आहे आणि लोकसंख्या-संक्रमणाचा हा अखेरचा टप्पा भारत कसा हाताळणार आहे, याहीसंबंधीचे विचार यात आहेत. भारतीय लोकसंख्येची ऐतिहासिक आणि अनुभवजन्य माहिती तर लेखकांनी गोळा केली आहेच; पण तिच्या आधारे जननक्षमता, मृत्यूप्रमाण, शहरीकरण इत्यादींच्या संदर्भातील भविष्यकालिन कल अथवा प्रवाह कसे असतील याची भाकितेही केली आहेत. लेखकांच्या मते वाढत्या लोकसंख्येमुळे शिक्षण, रोजगार आणि दारिद्र्य यांच्यावर विपरित परिणाम होत आहेतच; पण पाणी आणि सामूहिक वापराची इतर साधने यांच्या संदर्भातील आव्हानेही गंभीरच असणार आहेत. अन्नधान्याच्या बाबतीत मात्र पुस्तकात आशावाद व्यक्त करण्यात आला आहे. भविष्यातील आव्हाने, त्यांना सामोरे जाण्यासाठीची धोरणे, धोरणांच्या अंमलबजावणीतल्या त्रुटी अशा सर्वांचाच परामर्श प्रस्तुत पुस्तकात घेतलेला आहे. समाजाच्या सर्वच घटकांवर वाढत्या लोकसंख्येच्या पडणाऱ्या प्रभावाचे चित्रण यात असल्याने धोरणकर्ते तसेच अर्थशास्त्र व इतर सामाजिक-शास्त्रे, पर्यावरण, लोकसंख्याशास्त्र, विकास यांसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन करणारे संशोधक, स्वयंसेवी संघटना, पत्रकार अशा सर्वांना एक मौलिक संदर्भसाधन म्हणून या पुस्तकाचा उपयोग होऊ शकेल. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**